POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-१०० ● मुंबई, बुधवार, १२ नोव्हेंबर २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## ३ तास आधी विमानतळावर या... प्रवाशांना सूचना जारी मंदिरांना छावणीचे स्वरूप

# दिल्ली स्फोटाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात बंदोबस्त वाढला

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

राजधानी दिल्लीत सोमवारी संध्याकाळी लाल किल्ल्याजवळ झालेल्या भीषण स्फोटाने अख्खा देश हादरला आहे. लाल किल्ल्याजवळच्या पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या एका कारमध्ये संध्याकाळी 7 च्या आसास भीषण स्फोट झाला आणि क्षणात सगळं उद्धवस्त झालं. या स्फोटात आत्तापर्यंत 9 जणांचा मृत्यू झाला असून अनेक जण जखमी आहेत. त्यांच्यावर नजीकच्या रुग्णालयात उपचार सुरू असून मृतांचा आकाड वाढण्याची भीतीदेखील व्यकत होत आहे.






दरम्यान दिल्लीतील जीवघेण्या स्फोटानंतर महाराष्ट्रात सतर्कतेचा इशारा जारी करण्यात आला आहे. तसेच मुंबईतही विशेष खरबदारी घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. मुंबई, पुण्यासह देशातील अनेक प्रमुख शहरात अलर्ट जारी करण्यात आला आहे. दिल्लीतील स्फोटानंतर केंद्रीय गुप्तचर यंत्रणांकडून अलर्ट जारी केला असून राज्यातील महत्वाच्या शहरांची सुरक्षा वाढवण्यात आली आहे. ठिकठिकाणी पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आली असून पुणे पोलीस देखील अलर्ट मोडवर आले असून शहरात नाकाबंदी, लॉजस् चेकिंग, पेट्रोलिंग सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

पुणे रेल्वे स्टेशनवर बीडीडीएस पथकाच्या माध्यमातून संपूर्ण रेल्वे स्टेशनचा परिसर तसेच फलाटांची तपासणी करण्यात येत आहे. लोहमार्ग पोलीस आणि रेल्वे सुरक्षा बल यांच्यासह डॉग स्कोड, बॉम्ब शोधक पथक यांच्याकडून बॅगची आणि स्थानक परिसराची कसून तपासणी सुरू आहे. पिंपरी चिंचवड पोलिसांकडूनही हाय अलर्ट जारी असून पोलिसांकडून ठिकठिकाणी पोलीस बंदोबस्त लावत नाकाबंदी सुरू आहे. रात्रीच्या सुमारास वाहनांची कसून चौकशी देखील करण्यात आली. तसेच राज्यातील प्रमुख मंदिरांची सुरक्षाही वाढवण्यात आल्याने मंदिरांना छावणीचे स्वरूप आले आहे. प्रत्येक भाविकाची कसून तपासणी करण्यात येत आहे.

### दिल्लीत स्फोटाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील धार्मिक स्थळांना विशेष अलर्ट

काल संध्याकाळी दिल्ली येथे झालेल्या बॉम्बस्फोटाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील धार्मिक स्थळे व गर्दीच्या ठिकाणांना विशेष अलर्ट देण्यात आला आहे. या सर्व पार्श्वभूमीवर देशभरात प्रसिद्ध असलेल्या शेगाव येथील संत गजानन महाराज मंदिर परिसरातही पोलिसांनी विशेष खबरदारी घेत छावणीचा स्वरूप दिलेला आहे. प्रत्येक भाविकाची मेटल डिटेक्टरच्या माध्यमातून तपासणी करून आत सोडण्यात येत आहे. तर मंदिर परिसरात शीघ्रकृतिदल व पोलिसांचा मोठा पहारा लावण्यात आलेला आहे. या ठिकाणी सशस्त्र पोलीसही नेमण्यात आले आहेत.

### विमानतळावर 3 तासं आधी पोहोचण्याच्या सूचना

तसेच भारतातील सर्व विमानतळांवर सुरक्षा वाढविण्यात आली आहे. विमान प्रवाश्यांना प्रस्थानाच्या किमान ३ तास आधी विमानतळावर पोहोचण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सुरक्षा कारणाने चेक–इन आणि बोर्डिंगसाठी विमानतळावर तीन तास अगोदर पोहोचण्याचे अपील करण्यात आले आहे. विमानतळावर प्रवेश करण्यासाठी , वैध सरकार मान्यताप्राप्त फोटो ओळखपत्रे बाळगा. चेक–इन बॅगेज व्यतिरिक्त,7 किलो वजनाची फक्त 1हँडबॅग घेऊन जाण्याची परवानगी असेल. नियामक मार्गदर्शक तत्त्वांनुसार, सर्व प्रवाशांना बोर्डिंगपूर्वी दुय्यम सुरक्षा तपासणी करणे आवश्यक असेल अशा सूचना आकासा एयरलाईन्सतर्फे ट्विट करून प्रवाशांना देण्यात आल्या आहेत.

### महाराष्ट्रात बंदोबस्त वाढला

दिल्लीच्या बॉम्बस्फोटानंतर भुसावळ जळगाव रेल्वे स्टेशन हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. लोहमार्ग पोलीस आणि रेल्वे सुरक्षा बल यांच्याकडून डॉग स्कॉट शोधक पथक यांच्याकडून प्रवासी वर्गाची कसून चौकशी सुरु आहे. तसेच शिर्डीतही पोलिसांची नाकाबंदी आहे. दिल्लीतील भीषण स्फोटानंतर अहिल्यानगर जिल्हा पोलीस अलर्ट मोडवर असून शिर्डी पोलिसांकडून शिर्डी शहरात शिर्डीच्या प्रवेशद्वारासमोर नाकाबंदी सुरु आहे. राज्यभरातून शिडीर्ला येणाऱ्या वाहनांची शिर्डी पोलिसांकडून कसून तपासणी करण्यात येत आहे. शिर्डीच्या साईदरबारी देश-विदेशातून साईभक्त येत असतात, त्यामुळे कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी शिर्डीसह अहिल्यानगर जिल्ह्यातील पोलीस प्रशासन अलर्ट मोडवर आहेत.

### मुंबईत सुरक्षा यंत्रणा सतर्क

राजधानी दिल्लीत झालेल्या बॉम्बस्फोट 9 जणांनी प्राण गमावले. यानंतर देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईतही हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. या घटनेनंतर मुंबई छत्रपती शिवाजी टर्मिनस स्थानकावर सुरक्षा यंत्रणा सतर्क झाल्या असून पोलिसांना अलर्ट राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. दरम्यान दिल्ली स्फोटानंतर मुंबई सीएसटी येथे मोठा पोलीस बंदोबस्त असून सर्व सुरक्षा यंत्रणा अलर्ट मोडवर ठेवण्यात आली आहे. सीएसटी येथे आरपीएफ आणि जीआरपी संयुक्तपणे तपासणी करत आहे . संशयित प्रवाशाची बॅग किंवा वस्तूची डॉग स्क्वॉडमार्फत चौकशी केली जात आहे . कुठलीही अप्रिय घटना होऊ नये याची खबरदारी घेतली जात आहे. अफवांवर विश्वास ठेवू नये , सुरक्षा यंत्रणेला सहकार्य करावा , असं आवाहन पोलिसांतर्फे करण्यात आलं आहे. दिल्लीत संशयास्पद स्फोट झाल्यानंतर मुंबईतील माहीम रेती बंदर जवळ पोलीस अलर्टवर असून सागरी किनाऱ्यावर लक्ष ठेवून आहेत.

### दिल्ली ब्लास्ट नंतर मुंबई अलर्ट मोडवर

मुंबईतील प्रसिद्ध देवस्थान सिद्धीविनायक मंदिरात भाविकांची मोठी गर्दी असते. या अनुषंगाने मंदिराचे कोषाध्यक्ष आचार्य पवन त्रिपाठी यांनी तात्काळ सर्व सदस्यांसोबत सुरक्षा आढावा संदर्भात पोलिस प्रशासनांसोबत बातचित केली. येणा-या भाविकांची तपासणी कडक सुरु ठेवण्यात आली आहे. मंदिर परीसरात पोलिस सुरक्षा देखील कडक करण्यात आली.

### कल्याण रेल्वे स्टेशन परिसरात कडेकोट पोलीस बंदोबस्त

कल्याण रेल्वे स्टेशन परिसरात गेल्या काही दिवसांमध्ये गुन्हेगारी घटनांमध्ये वाढ झाली होती तसेच दिल्लीत घडलेल्या घटनेच्या पार्श्वभूमीवर कल्याण पोलीस देखील अलर्टवर मोडवर आलेत . स्टेशन परिसरात आज सायंकाळच्या सुमारास कल्याण पोलिसांचे पथक दाखल झाले . कल्याण स्टेशन परिसरात नाकाबंदी करत वाहनाची ,प्रवाशांची तपासणी केली . सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून कल्याण पोलीस अलर्ट मोडवर असल्याचे एसीपी कल्याणजी घेटे यांनी सांगितलं.



### सीएसटीला पोलिसांचा वेढा, दिल्लीत स्फोट होताच मुंबई खाकी वर्दीची गस्त

राजधानी दिल्लीमध्ये लाल किल्ला परिसरात एका व्हॅनमध्ये मोठा स्फोट झाला आहे. या स्फोटानंतर दिल्ली हादरली आहे. दिल्लीमध्ये घटनास्थळी पोलीस दाखल झाले असून तपासाची चक्रं फिरवली जात आहेत. हा एक साधारण स्फोट होता की यामागे काही घातपात आहे, याचा शोध दिल्ली पोलीस घेत आहेत. घटनास्थळावरील सर्व पुरावे पोलीस, फॉरेन्सिक टीकमकडून जमा केले जात आहेत. दिल्लीत घटनास्थळावर बॉम्बनाशक पथक, डॉक स्कॉड दाखल झाले असून सर्व बाजूंनी तपास केला जात आहे. असे असतानाच आता दिल्लीतील स्फोटानंतर मुंबईतही हायअलर्ट जारी करण्यात आला आहे. मुंबईतील प्रमुख ठिकाणांवर पोलिसांनी गस्त वाढवली आहे. मुंबईच्या सीसीएसटी परिसरात पोलिसांनी सुरक्षा वाढवली आहे. मुंबई पोलीस सध्या हायअलर्टवर आहेत. या शहरात जिथे-तिथे पोलीस दिसत आहेत. खबरदारी म्हणून सर्व रेल्वे स्थानकांवर पोलिसांकडून तपासणी केली जात आहे. संशयित व्यक्तींची झाडाझडती घेतली जात आहे. पोलिसांची पथकंच्या पथकं सर्वत्र फिरताना दिसत आहेत. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. या शहरात काही दुर्घटना घडली तर त्याचा परिणाम संपूर्ण देशात पडतो. त्यामुळेच आता खबरदारी म्हणून मुंबई पोलिसांनी हायअलर्ट जारी करत खबरदारी घेतली आहे. मिळालेल्या माहितीनुसार दिल्लातील स्फोटानंतर मुंबईसह पुणे शहरातही हायअलर्ट जारी करण्यात आले आहे.

## काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत हुडहूडी!

### महाराष्ट्रात एकाएकी थंडी वाढण्यामागे कारण काय?

■मुंबई। प्रतिनिधी,

देशभरात सध्या थंडीचा कडाका वाढण्यास सुरुवात झाली असून, झारखंड, मध्य प्रदेशापासून अतीव उत्तरेकडे असणाऱ्या जम्मू काश्मीर, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड यांसारख्या राज्यांमध्येसुद्धा थंडीचा कडाका वाढताना दिसत आहे. या शीतलहरींच्या परिणामस्वरुप महाराष्ट्रातही शीतलहरींचा मारा होण्यास सुरुवात झाली असून, राज्यात थंडीचा कडाका वाढण्यास सुरुवात झाल्याचं हवामान विभागानं स्पष्ट केलं आहे.



राजच्यातील मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात येणाऱ्या जिल्ह्यांसह उत्तर महाराष्ट्रसुद्धा गारठण्यास सुरुवात झाली असून, उर्वरित राज्यात हवामान बहुतांशी कोरडं असेल असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. सध्या बंगालच्या उपसागरात चक्राकार वाऱ्यांची स्थिती असून, तामिळनाडू आणि नजीकच्या भागामध्ये याचे परिणाम पाहायला मिळत आहेत. तर महाराष्ट्राच्या किनारपट्टी भागांमध्ये दुपारच्या वेळी उष्मा अधिक भासत आहे. तर, पहाट मात्र गारठ्यानं तर कुठं गुलाबी थंडीनं सुरू होत आहे अशीच स्थिती सध्या राज्यात दिसून येतेय.

## मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी केली केईएमची पाहणी, ढीसाळ कारभाराबाबत डीनला विचारला जाब

मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या केईएम रुग्णालयाच्या पाहणी दौऱ्यादरम्यान रुग्णांनी आणि त्यांच्या नातेवाईकांनी रुग्णालयाच्या ढीसाळ आणि घोटाळेबाज कारभाराचा पाढाच वाचला. रुग्णांची नोंदणी करणारा विभाग अतिशय अरुंद आहे, त्यात साधे पंखे ही नाहीत. एकाच जागेवर हजारोंच्या संख्येने लोक तिष्ठत बसलेले असतात. जुनी इमारत दोन माळ्यांची तर नवी इमारत १३ माळ्यांची असून अनेकदा लिफ्ट बंद असते. अशा अवस्थेत रुग्णांना स्वतः संबंधित विभागात घेऊन जावे लागत असल्याचे नातेवाईकांनी सांगितले.

■ठाणे। प्रतिनिधी,

राज्याचे कॅबिनेट मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी आज मुंबई महापालिकेच्या परळ येथील केईएम रुग्णालयाचा पाहणी दौरा केला. तेथील गलथान आणि ढिसाळ कारभाराबाबत त्यांनी रुग्णालयाच्या डीन डॉ. संगीता रावत यांना जाब विचारला. पाहणी दौऱ्या दरम्यान रुगालयात केवळ नोंद करण्यासाठी रुग्णांना आणि त्यांच्या नातेवाईकांना दोन ते तीन तास ताटकळत उभे राहावे लागत असल्याचे चित्र मंत्री लोढा यांच्या निदर्शनाला आले. याबाबत त्यांनी तीव्र संताप व्यक्त करत प्रशासनाला चांगलेच धारेवर धरले. पुढच्या आठवड्यापर्यंत रूग्णांना योग्य आणि वेळेत उपचार जर मिळाले नाहीत तर पुन्हा रुग्णालयाचा दौरा करून संबंधित अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचा इशाराही त्यांनी यावेळी दिला. गेल्या २५ वर्षात मुंबई पालिकेत सत्तेत असलेल्यांनी भ्रष्ट व्यवस्था उभी केली असून त्याचा सामान्य जनतेला आजही त्याचा भुर्दंड बसत असल्याचा आरोप लोढा यांनी केला आहे.

### एमआरआय टेस्टसाठी मार्च २०२६ पर्यंत वेटिंग

खाजगी रक्त चाचण्या आणि इतर वैद्यकीय चाचण्या कंपन्यांचे प्रशासकीय अधिकाऱ्यांशी लागेबांधे असल्याचा गंभीर आरोपही रुग्णांच्या नातेवाईकांनी केला. साध्या रक्त चाचण्या करण्यासाठी ही खाजगी लॅबला पाठवलं जात असल्याचेही यावेळी रुग्णांनी सांगितले. तसेच एमआरआय, सीटीस्कॅन, २ डी ईको, सोनोग्राफी या आवश्यक चाचण्यांसाठी रुग्णालयात ३ ते ६ महिन्यांचा वेटिंग पिरियड असल्याचेही सांगितले. एमआरआय टेस्टसाठी सध्या मार्च २०२६ पर्यंत वेटिंग, सीटीस्कॅनसाठी जानेवारी २०२६ पर्यंत वेटिंग आहे. सोनोग्राफीसाठी देखील हीच अवस्था असल्याचे दिसून आले आहे.



### दलालीच्या विळख्यात रुग्णालय

बाहेरच्या चाचणी केंद्राचा फायदा होण्यासाठी रुग्णांना दलालांमार्फत खाजगी लॅबमध्ये पाठवलं जात आहे. याबाबतही मंत्री लोढा यांनी डीन डॉ. संगीता रावत यांना जाब विचारला. त्याचबरोबर मुंबई महापालिकेच्या रुग्णालयात नोंदणी करण्यासाठी क्यूआर कोड आणि इतर संगणकीकरणाची यंत्रणा स्थापित करण्यासाठी पालिकेने तब्बल ५५६ कोटी रुपयांच्या निधीची तरतूद केली असताना अजूनही व्यवस्था कार्यान्वित होत नसल्याने हा भोंगळ कारभाराचा नमुना असल्याचे मंत्री लोढा यांनी सांगितले. याबाबत रावत यांना विचारणा करताच त्यांनी सोयीस्करपणे आवश्यक मनुष्यबळ नसल्याचे उत्तर दिले. यावेळी केईएम प्रशासनाला खडसावत त्यांनी ऑनलाईन प्रणाली वापरा किंवा अन्य सुविधाजनक व्यवस्था निर्माण करा, पण रुग्णाच्या नोंदीसाठी अर्ध्या तासापेक्षा जास्त वेळ खर्च होता कामा नये असा सज्जड दम दिला.

### द्यकीय क्षेत्रातही दलालीची व्यवस्था

परदेशी वैद्यकीय शिक्षण घेऊन मुंबईत परतलेल्या डॉक्टरांना डे केअर सेंटरची नोंदणी करण्यासाठी खान नावाच्या व्यक्तीने तब्बल २५ लाख रुपये मागितल्याचे लोढा यांनी सांगितले. ज्या पक्षाने गेल्या २५ वर्षात मुंबई महापालिकेवर सत्ता गाजवली, त्यांनीच वैद्यकीय क्षेत्रातही दलालीची व्यवस्था उभारली असून त्यामुळेच सामान्य नागरिकांना त्यांचा अधिकार मिळत नाही. यासंदर्भात मुंबई पालिका आयुक्त भूषण गगराणी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निदर्शनाला हा प्रकार आणून देणार असल्याचेही मंत्री लोढा यांनी सांगितले.

## महायुतीत पहिली मोठी फुट, बड्या नेत्याची थेट घोषणा!




■मुंबई। प्रतिनिधी,

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर झालेल्या आहेत. आता युती आणि आघाडी करण्यासाठी राजकीय पक्षांत मोठ्या हालचाली वाढल्या आहेत. या निवडणुकीत आपल्याच पक्षाची सरशी व्हावी यासाठी सर्वच बडे नेते प्रयत्न रत आहेत. नाशिकमध्ये तर राजकीय घडामोडींना चांगलाच वेग आला आहे. येथे ११ नगरपरिषदांपैकी एकूण ३ नगरपरिषदांच्या निवडणुकीसाठी महायुतीत उभी फुट पडली आहे. अजित पवार यांच्या पक्षाचे नेते समीर भुजबळ यांनी काहीही झालं तरी आम्ही एकनाथ शिंदे यांच्या पक्षाशी युती करणार नाही, असं थेट जाहीर करून टाकलं आहे. विशेष म्हणजे भाजपालाही नाशिकमध्ये राष्ट्रवादी आणि शिवसेना यांच्यात समेट घडवून आणणे अशक्य असल्याचे वाटत आहे.

**नाशिकमध्ये महायुतीत फुट :** राष्ट्रवादीचे नेते समीर भुजबळ यांनी सोमवारी (१० नोव्हेंबर) भाजपाचे नेते गिरीश महाजन यांची भेट घेतली. या भेटीत युतीबाबत चर्चा करण्यात आली. ही भेट झाल्यानंतर समीर भुजबळ यांनी राष्ट्रवादीची नगपरिषदेची रणनीती त्यांनी स्पष्ट केली. येवल्यात आमच्या राष्ट्रवादी पक्षाची स्वबळावर लढण्याची तयारी आहे. परंतु काहीचं म्हणणं आहे की भाजपासोबत ही निवडणूक लढवली तर ते सोईचं राहील. येवल्यात शिंदे गटाची काही ताकद नाही. ते आमचे प्रतिस्पर्धी आहेत. त्यामुळे तिथे आम्ही त्यांच्यासोबत युती करू शकत नाही, अशी माहिती समीर भुजबळ यांनी दिली. तसेच, मनमाड आणि नांदगावमध्येही अशीच स्थिती आहे. तेथे शिंदे गट आमचा विरोधक आहे. त्यामुळे तिथे शिंदे गटासोबत युती करण्याचा प्रश्नच येत नाही, असे समीर भुजबळ यांनी स्पष्टपणे सांगितले.

**गिरीश महाजन यांनीही दिला दुजोरा :** तर दुसरीकडे आम्ही महायुतीमध्ये लढणार आहोत. युतीसंदर्भात चर्चा करण्यासाठी आमदार सुहास कांदे मला भेटून गेले आहेत. तासाभराने समीर भुजबळ हेदेखील मला भेटून गेले आहेत. आम्ही सर्वांशी चर्चा करत आहोत. नाशिक जिल्ह्याती नगरपालिका, नगरपरिषदा आहेत, त्या सोबत लढवण्याचा आमचा प्रयत्न असल्याचे गिरीश महाजन यांनी सांगितले आहे. सुहास कांदे आणि समीर भुजबळ यांच्यातील राजकीय वैर सर्वांनाच माहिती आहे. त्यामुळे साहजिकच ते वेगळे लढतील, असेही गिरीश महाजन यांनी स्पष्ट केले. त्यामुळे नाशिकध्ये तीन नगरपरिषदांसाठी महायुतीत उभी फुट पडल्याचे आता जवळजवळ स्पष्ट झाले असून तेथे नेमकं कोण बाजी मारणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## शेजारचं दुकान फोडून ज्वेलर्सच्या दुकानात एन्ट्री

### बोगदा करुन सिनेस्टाईल चोरी, ४ कोटींचा मुद्देमाल लंपास... पालघर शहरात खळबळ

■पालघर। प्रतिनिधी,

पालघर शहरातील मुख्य बाजारपेठ पेठेत असलेल्या नाकोडा ज्वेलर्स या ज्वेलर्स दुकानात चोरी झाल्याची घटना घडली आहे. चोरट्यांनी ३ कोटी ७२ लाख ३५ हजार ४६० रुपये किमतीचे सोने आणि चांदीचे दागिने, २० लाख रोख असा एकूण ३ कोटी ७२ लाख ३५ हजार ४६० रुपये किमतीचा मुद्देमाल चोरट्यांनी घरफोडी करून चोरून नेला आहे. याप्रकरणी पालघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस करीत आहेत. पालघर शहरातील अशोका अंबर शॉपिंग कॉम्प्लेक्समधील नाकोडा ज्वेलर्स दुकानाचे मालक पीयूष दिनेश जैन ज्वेलर्स दुकान बंद करून आपल्या घरी निघून गेले. चोरट्यांनी ज्वेलर्स दुकानाच्या शेजारी असलेल्या जान्हवी फॅशन या कपड्याच्या दुकानात शटर तोडून आत प्रवेश केला. त्यानंतर कपड्याच्या दुकानातील भिंतीला बोगदा करून नाकोडा ज्वेलर्स दुकानात शिरले.पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता ५ ते ६ चोरटे ही घरफोडीसाठी आले असल्याचे सीसीटीव्ही कॅमेऱ्यात समोर आलं आहे. अंबर शॉपिंग कॉम्प्लेक्स येथे दुकानदारांनी एकत्रित रित्या ठेवलेल्या सुरक्षारक्षक दिपक सिंग आणि नरेश दोघांनी संगनमत करून अन्य साथीदारांच्या मदतीने ज्वेलर्स दुकानात चोरी केल्याची माहिती समोर आली आहे. यांप्रकरणी पालघर पोलीस ठाण्यात आरोपी सुरक्षारक्षक दिपक सिंग, नरेश व अज्ञात चोरट्यांविरोधात भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३०५(१), ३३१(३), ३३१(४), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस करीत आहेत.




ज्वेलर्स दुकानातील तिजोरी गॅस कटरने कापून त्यात ठेवलेल्या ९२ सोन्याच्या चैन, ३१ नेकलेस, २७१ अंगठ्या, 359 कानातील एअररिंग्स टॉप्स आणि झुमके, १२० कानातील रिंग्स, ९२ मंगळसूत्राला लावण्यात येणारे पेंडल, १४६ सोन्याच्या चैनचे पेंडल, १९ कानचैन, ११८ मंगळसूत्राच्या वाटी, ८ ब्रेसलेट, १२ कानातले लटकन, बारा सोन्याचे कॉइन, ४० किलो चांदीचे दागिने आणि २० लाख रुपये रोख रक्कम असा एकूण ३ कोटी ७२ लाख ३५ हजार ४६० रुपयांचा ऐवज चोरून चोरटे पसार झाले. शनिवारी रात्रीच्या सुमारास ही घटना घडली असून घटनेची माहिती मिळाल्यानंतर पालघर पोलीस घटनास्थळी दाखल झाले व संपूर्ण घटनास्थळाची पाहणी करा घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला.



# संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

## याला जबाबदार कोण?



जेवढ्या जास्त जनतेची अडवणूक करण्याची क्षमता, तेवढी जबाबदारी अधिक. पण, संघटित शक्तीला याचा बऱ्याचदा विसर पडतो. संघटना मोठी असेल आणि अन्य समाजाची अडवणूक करण्याची ताकदही असेल, तर अशा संघटित शक्तीला नेहमीच अधिक चेव येतो. अशा संघटनेचं नेतृत्व किती परिपक्व आणि संयमी आहे, यावर त्या संघटनेची लोकाभिमुखता आणि ओळख ठरत असते. सेंट्रल रेल्वे मजदूर संघाच्या मुंबई शाखेला गुरुवारी याचा नेमका विसर पडला. त्यांनी केलेल्या आंदोलनामुळे झालेल्या प्रवाशांच्या गोंधळात तीन जणांचा हकनाक बळी गेला. सेंट्रल रेल्वे मजदूर संघ ही रेल्वे उद्योगातील कर्मचाऱ्यांची मोठी संघटना. मुंबईचं जीवनचक्र सुरळीत ठेवण्यासाठी मुंबईतली लोकल सेवा किती आवश्यक आहे, याची जाणीव या संघटनेला असणारच. संध्याकाळची, कार्यालयं सुटण्याची वेळ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्थानकात किती प्रचंड गर्दीची असते, एखादी लोकल रद्द झाली तरी किती गोंधळ होतो याची कल्पना या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना नसणार, असं म्हणताच येणार नाही. तरीही या संघटनेने सुमारे तासभर मोटरमन आणि गार्ड यांची वाट अडवून धरली. अप्रत्यक्ष 'रस्ता रोको' केला. ऐन गर्दीच्या वेळी अडवणूक करण्यासाठी, आपली ताकद (खरे तर उपद्रवमूल्य) सिद्ध करण्यासाठी केलेलं हे अनावश्यक अतिरेकी आंदोलन होतं. आंदोलन पूर्वकल्पना देऊन केलं होतं, हे ठीक. पण, त्याची परिणामकारकता रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या लक्षात आली नाही, की छुप्या सहानुभूतीपोटी त्यांच्याकडून या आंदोलनाच्या परिणामांकडे दुर्लक्ष झालं? तीन सामान्य प्रवाशांचा बळी गेला असल्याने या आंदोलनाची आणि आंदोलनात प्रत्यक्ष भाग घेतलेल्या आंदोलकांची चौकशी करणं आता 'रेल्वे' ला भाग आहे. आंदोलनाची नोटीस मिळाल्यानंतरही त्याकडे गांभीर्याने न पाहणाऱ्या अधिकाऱ्यांचा समज नक्की काय होता, आंदोलनासाठी त्यांनी दिलेली परवानगी नक्की कोणत्या स्वरूपाची होती, याचीही शहानिशा झाली पाहिजे. दिलेली परवानगी आणि आंदोलनाचं प्रत्यक्ष रूप, कालावधी यात तफावत होती का? असल्यास किती आणि ती नक्की कोणाकडून? याचंही सत्यशोधन झालं पाहिजे. रेल्वे कर्मचाऱ्यांच्या या आंदोलनाला पार्श्वभूमी होती पाच महिन्यांपूर्वी मुंब्रा रेल्वे स्थानकाजवळ झालेल्या अपघाताची. धावत्या लोकलमधून पडून त्या अपघातात पाच प्रवाशांचा बळी गेला होता. त्या अपघातातील 'रेल्वे'ची जबाबदारी नक्की करण्यासाठी मुंबईतील व्हीजेटीआय या तंत्र शिक्षण संस्थेकडे रेल्वेनेच काम दिलं होतं. व्हिजेटीआयने दिलेल्या अहवालानुसार, रेल्वे पोलिसांनी दोन अभियंत्यांविरोधात गुन्हे दाखल केले. गुन्हे दाखल करण्याची ही प्रक्रिया रेल्वे कर्मचाऱ्यांना मान्य नाही. तद्वत हे गुन्हे मागे घ्यावेत, अशी त्यांची मागणी होती आणि त्यासाठी गुरुवारचं आंदोलन होतं. म्हणजे, ज्या अपघातात रेल्वे प्रवाशांचे बळी गेले, त्या अपघाताची नक्की केलेली जबाबदारी मान्य नाही म्हणून झालेल्या आंदोलनात आणखी प्रवाशांचे बळी! 'रेल्वे' नेच नेमलेली समिती, त्या समितीने 'रेल्वे'ला दिलेला अहवाल, त्या अहवालानुसार रेल्वे पोलिसांनी दाखल केलेले गुन्हे, ते मान्य नाही, म्हणून रेल्वे कर्मचाऱ्यांचं आंदोलन-आणि त्यात बळी मात्र प्रवाशांचा. अशा प्रवाशांचा, ज्यांचा ना आरोपपत्राशी संबंध, ना त्यांना आंदोलनाशी काही सोयरसुतक. रेल्वे सेवा ठप्प झाली, म्हणून इच्छित स्थळी वेळेत पोहोचण्यासाठी त्यांनी शक्य होतं, ते केलं. रेल्वेतून उतरून पुढचं स्थानक गाठण्यासाठी त्यांनी रेल्वे रुळातून चालायला सुरुवात केली. त्यात त्यांना मागून आलेल्या रेल्वेचा धक्का बसला. काही जखमी झाले, काही मृत्युमुखी पडले. अनेकदा तांत्रिक कारणाने, राजकीय पक्षांचे कार्यकर्ते बंद घडवून आणण्यासाठी रेल्वे सेवा ठप्प करतात तेव्हां, पावसाळ्यात रेल्वे मार्गावर पाणी साठतं तेव्हां...अशा अनेकवेळी चालत्या रेल्वेगाडीत असलेल्या प्रवाशांनी किती काळ ठप्प रेल्वेत बसून राहायचं? उतरून आपल्या इच्छित स्थळाच्या दिशेने चालू लागणं हेच त्यांच्या हाती असतं. अशावेळी रेल्वे मागार्तूनच चालावं लागतंच. दुसरा काय इलाज असतो? हे 'रेल्वे'लाही माहीत आहे. किंबहुना अशा आपदस्थितीत महिलांना, वृद्धांना डब्यातून रेल्वे मार्गावर उतरताना त्रास होऊ नये, दुखापत होऊ नये यासाठी काही वर्षांपूर्वी डब्यांना खाली काही पायऱ्यांच्या शिडीची व्यवस्थाही 'रेल्वे'नेच केली आहे. त्यामुळे, सुमारे तासभर रेल्वेसेवा ठप्प झाल्यानंतर आणि त्याबाबतचं कारण अडकून पडलेल्या रेल्वे प्रवाशांपर्यंत पोहोचवण्याची दक्षता न घेतलेल्या 'रेल्वे'ने आता रेल्वे मागार्तून चालताना अपघातात जीव गमावलेल्या निष्पाप जीवांनाच गुन्हेगार ठरवू नये!! मुंबईत माणसाच्या जीवाची किंमत दिवसेंदिवस घसरतेच आहे. सरकारी यंत्रणांच्या लेखी तर माणसाचा जीव हा नुकसानभरपाईची रक्कम (किंवा वाचलाच तर) उपचाराचा खर्च देण्यापुरताच महत्त्वाचा उरला आहे. कोणताही मोठा अपघात झाला, की काही तासात काही रक्कम जाहीर होते. विषय तिथेच संपतो. मुंबई किंवा अन्य कोणत्याही महानगरात नागरिकांना करावा लागणारा प्रवास हेच त्यांचं जीवन आहे. हे जीवन सुरक्षित करण्याला सरकारच्या यंत्रणांचं सर्वाधिक प्राधान्य असलं पाहिजे. ज्या यंत्रणांच्या हाती प्रवासी सेवा येते, त्यांनी प्रवाशांचा प्रवास अधिक सुलभ, सुरक्षित; म्हणजेच शिस्तशीर कसा होईल, यासाठी सतत प्रयत्नशील राहिलं पाहिजे. सेवा हाताळणाऱ्या कर्मचाऱ्यांना आपल्या जबाबदारीचं भान नसेल, सुरक्षिततेचं महत्त्व त्यांनाच कळत नसेल, त्यांच्या अंगी शिस्त नसेल, तर यंत्रणेत यातले कोणतेच गुण येणार नाहीत. अशा सेवा नागरिकांसाठी निर्धोक राहणार नाहीत. महानगरी जनतेला कायम मृत्यूच्या टांगत्या तलवारीखालीच जगावं लागेल. रेल्वे, पोलीस, रुग्णालय, बस किंवा विमानसेवा या वेगाने वाढणाऱ्या नागरिकरणातील अत्यंत संवेदनशील सेवा आहेत. नागरी जीवनाचा सगळा डोलारा या सेवांवर; पर्यायाने या सेवेतील कर्मचाऱ्यांवर आहे. दुदैर्वाने गेल्या काही वर्षात ही समज लोप पावत चालली आहे. या सेवांवरील अवलंबित्व जसजसं वाढत चाललं आहे, तसतसं आपलं उपद्रवमूल्य वसूल करण्याची प्रवृत्ती वाढत चालली आहे. कर्मचाऱ्यांचे हक्क, त्यांना आपल्या भावना व्यक्त करण्याचा अधिकार असलाच पाहिजे. फक्त त्याला जबाबदारी, संयम आणि विवेकाचं भान असलं पाहिजे. ही अपेक्षा जेवढी कर्मचाऱ्यांकडून आहे, त्यापेक्षा दसपट त्यांच्या नेत्यांकडून आहे. असंघटित प्रवासांचा क्षोभ होतो, तेव्हा काय होतं याचा अनुभव सगळ्यांनाच आहे. त्यामुळे, प्रवाशांच्या जीवाला काही किंमत नाही, असा समज कृपा करून कोणीही होऊ देऊ नये.

# जमीन खरेदीत सरकारच्या नैतिकतेची विक्री?

**पुण्यातील काही रजिस्ट्रेशन कार्यालयांत गेल्या काही महिन्यांत अनेक व्यवहार घडल्याची चर्चा आहे. जैन बोर्डिंगची ३ हजार कोटींची जमीन केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळांच्या व्यावसायिक भागीदाराने २९० कोटींत घेतल्याचे प्रकरण समोर आल्यानंतर व्यवहार रद्द केल्याचे सांगितले.**

महाराष्ट्राचे राजकारण पुन्हा एकदा भूखंड घोटाळ्याने ढवळून निघाले आहे. ७० हजार कोटींच्या सिंचन घोटाळ्याचे आरोप असलेले उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सुपुत्र पार्थ पवार या घोटाळ्याच्या केंद्रस्थानी आहेत. त्यांनी १,८०० कोटी रुपयांच्या सरकारी भूखंडांचा श्रीखंड अवघ्या ३०० कोटी रुपयांत खाल्ल्याचे समोर आले आहे. हे प्रकरण सत्ता, पैसा आणि प्रशासनाच्या संगनमताचे आदर्श उदाहरण आहे. या घोटाळ्याने पुणे, मुंबईतील भूखंड व्यवहारांच्या काळ्या दुनियेचे नागडे सत्य समोर आले आहे. जिथे अधिकारी, बिल्डर आणि राजकारणी एकत्र येऊन जनतेच्या मालमत्तांची लूट करतात. या प्रकरणी दुय्यम निबंधक तारु, पार्थ पवारांना जमीन विकणारी शीतल तेजवानी आणि अमेडिया कंपनीचे भागीदार दिग्विजय पाटील यांच्यावर गुन्हे दाखल झाले; पण घोटाळ्याचे सूत्रधार पार्थ पवारांवर गुन्हा दाखल करण्याऐवजी सरकारने त्यांना संरक्षण दिले आहे. हे प्रकरण महाराष्ट्र सरकारच्या नैतिक दिवाळखोरीचा सर्वात मोठा पुरावा आहे, जिथे दररोज न्यायाचा लिलाव होतो आणि सत्ताधाऱ्यांच्या नातेवाईकांना आणि बगलबच्च्यांना कायदा वाकवून मोकळं सोडलं जातं.

### ३०० कोटींच्या व्यवहारात हजारो कोटींची लूट

पुणे शहरातील उच्चभ्रू आणि पंचतारांकित परिसर म्हणून प्रसिद्ध असलेल्या कोरेगाव पार्क परिसरातील सरकारी मालकीची ४० एकर जमीन उपमुख्यमंत्री अजित पवारांचे सुपुत्र पार्थ पवार यांच्या कंपनीने अवघ्या ३०० कोटी रुपयांना खरेदी केली. १,८०० कोटी रुपयांचे मूल्य असणारी जमीन अवघ्या ३०० कोटी रुपयांत पार्थ पवारांच्या अमेडिया कंपनीच्या घशात घातली. नियमानुसार या व्यवहारासाठी २१ कोटी रुपयांचे मुद्रांक शुल्क आकारले पाहिजे होते; पण अवघ्या ५०० रुपयांचे मुद्रांक शुल्क घेऊन खरेदी खताची नोंदणी झाली. या व्यवहाराची गती, फाइलींच्या प्रवासाचा आणि मंजुरीचा वेग यावरून प्रशासनातील प्रत्येक पातळीवरून ''विशेष मदत'' मिळाली नसती तर हा व्यवहार अशक्य होता हे स्पष्ट आहे.

### बोगस कागदपत्रे आणि मुद्रांक शुल्क माफी

अमेडिया कंपनीत पार्थ पवार ९९ टक्क्यांचे, तर दिग्विजय पाटील फक्त १ टक्क्याचे भागीदार आहेत. या अमेडिया कंपनीतर्फे दिग्विजय पाटील यांनी मे महिन्यात हा खरेदी व्यवहार केला होता. फक्त १ लाख रुपयांचे भागभांडवल असणाऱ्या या कंपनीने ३०० कोटी रुपयांची जमीन खरेदी केलीच कशी? या जमिनीच्या इतर हक्कातील २७२ धारक व्यक्तींनी २००६ मध्ये कुलमुखत्यारपत्र शीतल तेजवानी यांना दिले होते. त्याआधारे पार्थ पवार यांच्या अमेडिया कंपनीने ही जमीन ३०० कोटी रुपयांना खरेदी केल्याचे दस्त नोंदणीच्या कागदपत्रांतून स्पष्ट झाले आहे. ही जमीन राज्य सरकारने 'बॉटनिकल सर्व्हे ऑफ इंडिया'ला १९८८मध्ये ५० वर्षांसाठी एक रुपया नाममात्र भाडेतत्त्वावर दिली आहे. जमिनीचा सातबारा २०१८ मध्ये ह्यबंदद्ब झाला असताना तो खरेदी खतावेळी जोडण्यात आला. त्याआधारे खरेदी करण्यात आला. दस्त नोंदणीवेळी 'अमेडिया'ने जिल्हा उद्योग केंद्राकडून खासगी 'आयटी पार्क' उभारण्याच्या नावाखाली पाच टक्के मुद्रांक शुल्क माफी मिळविली; परंतु उर्वरित १ टक्का 'एलबीटी' आणि १ टक्का मेट्रो सेस असे दोन टक्के मुद्रांक शुल्क भरणे गरजेचे होते. मात्र, दुय्यम निबंधकांनी तेही न आकारता केवळ ५०० रुपयांच्या मुद्रांक शुल्कावर दस्तनोंद केली. पण ५०० रुपये भरले नसल्याची माहिती आता समोर आली आहे.

### वायुवेगाने २७ दिवसांत व्यवहार पूर्ण

अमेडिया कंपनीनं सरकारच्या आयटी धोरणाचा आधार घेत स्टॅम्प ड्युटीपासून सूट मिळवली. त्या धोरणानुसार, गुंतवणुकीच्या किमान २५ टक्के इतकी अतिरिक्त स्थिर भांडवली गुंतवणूक केल्यास स्टॅम्प ड्युटी माफ होते. त्यामुळे २२ एप्रिल २०२५ रोजी अमेडिया कंपनीने आयटी पार्क उभारण्याचा ठराव पारित केला. या ठरावावर पार्थ पवार आणि त्यांचे मामेभाऊ दिग्विजय पाटील यांच्या स्वाक्षऱ्या होत्या. केवळ दोन दिवसांनी, म्हणजे २४ एप्रिलला उद्योग संचालनालयाने स्टॅम्प ड्युटी माफ करण्याची मंजुरी दिली आणि अवघ्या २७ दिवसांत जमिनीचा व्यवहार पूर्ण झाला.

### सरकारी यंत्रणा आणि दलालशाहीचे जाळे

या प्रकरणात संबंधित सब-रजिस्ट्रारला निलंबित करून सरकारने आपली जबाबदारी संपवली आहे. पुण्यातील काही रजिस्ट्रेशन कार्यालयांत गेल्या काही महिन्यांत अशा प्रकारचे अनेक व्यवहार घडल्याची चर्चा आहे. जैन बोर्डिंगची ३ हजार कोटींची जमीन केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळांच्या व्यावसायिक भागीदाराने २९० कोटींत घेतल्याचे प्रकरण समोर आल्यानंतर हा व्यवहार रद्द केल्याचे सांगितले. पण या प्रकरणात कोणावरही कारवाई झाली नाही. मंत्रालयापासून निबंधक कार्यालयापर्यंत दलालशाहीचे जाळे इतके घट्ट विणले गेले आहे की, जमीन विक्रीपासून झोन बदलापर्यंत प्रत्येक टप्पा 'कमिशन'वर ठरतो.

### सामान्य नागरिकासाठी नियम, सत्ताधाऱ्यांसाठी मात्र शॉर्टकट

सामान्य नागरिकाला सातबारावर नाव लावायला काही महिने लागतात. नोंदणी, बांधकाम परवानगी, मूल्यांकन, या सगळ्या प्रक्रियांमध्ये सरकारी कार्यालयांची दारे ठोठवावी लागतात. पण सत्ताधाऱ्यांच्या निकटवर्तीयांसाठी सगळे काही एका क्लिकवर घडते. पार्थ पवार प्रकरणात ज्या वेगाने सरकारी जमीन खरेदी, नोंदणी आणि कागदपत्र प्रक्रिया झाली, या गतीपासून सामान्य नागरिक कोसो दूर आहेत. हेच शासन यंत्रणेच्या नैतिक दिवाळखोरीचे प्रमाण आहे. महायुती सरकारच्या काळात जमीन, पायाभूत प्रकल्प आणि औद्योगिक विकासाच्या नावाखाली शेकडो हेक्टर शासकीय जमीन मूठभर लोकांकडे वळवण्यात आली. समृद्धी महामार्ग, पुणे रिंगरोड आणि विरार-अलिबाग मल्टीमॉडल कॉरिडॉर यांसारख्या प्रकल्पांमध्येही जमिनीचे गैरव्यवहार किमती कमी दाखवून, वाढवून विक्री झाल्याचे आधीच स्पष्ट झाले आहे.

### ट्रिपल इंजिनाला भ्रष्टाचाराचे इंधन

या व्यवहारांच्या साखळीमध्ये ''दलाल'' आणि ''सुविधादाते'' म्हणून काही नावाजलेले रिअल इस्टेट लॉबिस्ट आणि प्रशासकीय अधिकारी सामील असल्याचे समोर आले आहे. आज महाराष्ट्रातले 'ट्रिपल इंजिन सरकार' भ्रष्टाचाराच्या इंधनावर अत्यंत वेगाने धावत आहे. एकीकडे केंद्रातील सत्ताधारी विरोधकांवर ईडी-सीबीआयचे हत्यार चालवतात, तर दुसरीकडे आपल्या सोयीच्या नेत्यांवर आरोप झाले की त्यांना पाठीशी घालतात. अजित पवारांवर शेकडो कोटींच्या सिंचन घोटाळ्याचे आरोप होते; आज तेच उपमुख्यमंत्री आहेत.

पार्थ पवारांनी जमीन हडपणे हे फक्त एक प्रकरण नाही तर राज्याच्या भ्रष्ट कारभाराचे प्रतीक आहे. सरकारने जर या घोटाळ्यांवर ठोस कारवाई केली नाही, तर सरकार या शब्दावरचा जनतेचा विश्वास संपुष्टात येईल. आज प्रश्न फक्त एवढाच नाही की, जमीन कोणाची विकली गेली? तर प्रश्न हा आहे की, या राज्यातील न्याय, प्रशासन आणि लोकशाहीची मालकी अजूनही जनतेकडे आहे का, की तीही जमिनीबरोबर विकली गेली आहे?




# पुत्र व्हावा ऐसा 'गुंडा'

मुलाचे पाय पाळण्यात दिसतात, असे म्हटले जाते. याचाच अर्थ मुलगा मोठा होऊन नेमका कुठला पराक्रम करणार किंवा पुढच्या आयुष्यात काय दिवे लावणार याचे संकेत त्याच्या लहानपणीच मिळू लागलेले असतात. किमान अशी उक्ती असली तरी मोठेपणी बहुतांश मुलांचे पाय हे आपल्या पित्याच्या पावलांवरच पडताना दिसतात. त्यामुळे जसा पिता, तसा पुत्र, असेही म्हटले जाते. यातून बाप मुलावर कसा प्रभाव टाकतो, हे प्रतीत होते. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांच्या कथित जमीन घोटाळ्यावरून तरी हेच म्हणावे लागेल. सध्या महाराष्ट्राच्या राजकारणात पवार पिता-पुत्र चांगलेच चर्चेत आहेत. एवढेच नाही, तर आपल्या पुत्राच्या पराक्रमामुळे अजित पवार राजकीयदृष्ट्या चांगलेच अडचणीतही आले आहेत. पार्थ पवार संचालक असलेल्या अमेडिया कंपनीने पुण्याच्या कोरेगाव पार्क परिसरात खरेदी केलेल्या जमिनीचे हे घोटाळा प्रकरण आहे. अमेडिया कंपनीने १ हजार ८०० कोटी रुपये बाजारमूल्य असलेली ४० एकर जमीन अवघ्या ३०० कोटी रुपयांना खरेदी केली. या जमीन खरेदीच्या व्यवहारावर २१ कोटी रुपयांचे मुद्रांक शुल्क कंपनीने भरणे अपेक्षित होते. परंतु मुद्रांक शुल्काची ही रक्कमही कंपनीला माफ करण्यात आली आणि अवघ्या ५०० रुपयांच्या मुद्रांक शुल्कावर जमिनीचा कायदेशीर व्यवहार करण्यात आला. या संपूर्ण जमीन व्यवहारात जागोजागी घोटाळाच घोटाळा झालेला दिसून येतो.

अमेडिया कंपनीने जी जमीन विकत घेतली ती महार वतनाची सरकारी जमीन आहे. ठराविक वर्गाला इनाम म्हणून मिळालेल्या या जमिनीची सहजासहजी खरेदी-विक्री करता येत नाही, त्यासाठी बऱ्याच अटी-शर्ती व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण कराव्या लागतात. अमेडिया कंपनीने या सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्या होत्या की नव्हत्या यावर असंख्य प्रश्न आता उपस्थित करण्यात येत आहेत. महाराष्ट्रात मुंबई-पुणे-नाशिक या तीन शहरांचा सुवर्ण त्रिकोण मानला जातो. ही तिन्ही शहरे एकमेकांशी रस्ते, रेल्वे आणि विमानसेवेने चांगल्या रितीने कनेक्टेड आहेत. सोबतच देशातील इतर शहरांशीदेखील या तिन्ही शहरांची उत्तम कनेक्टिव्हिटी आहे. त्यामुळे मुंबईपाठोपाठ पुणे आणि नाशकात जागोजागी विकासकामे सुरू आहेत. जागांच्या किमतीचा विचार करता मुंबईनंतर पुण्याचाच क्रमांक लागतो. मागच्या काही वर्षांत पुण्यात असंख्य बहुराष्ट्रीय कंपन्या स्थिरावल्या आहेत. कारखाने, आयटी कंपन्यांचे जाळे पुण्यात विणले गेले आहे. जागोजागी टोलेजंग टॉवर्स उभे राहिले असून परराज्यातील अनेकांनी आपले बस्तान पुण्यात बसवले आहे. हेच परप्रांतीय, धनदांडगे, राजकारणी वाट्टेल तेवढे पैसे मोजून स्थानिकांच्या जमिनी धडाधड विकत घेत आहेत.

मुंबईच्या पावलावर पाऊल ठेवून कॉस्मॉपॉलिटन शहर होत असलेल्या पुण्याच्या पालकमंत्रीपदाची धुरा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे आहे. किंबहुना, सरकार कुठलेही असो आघाडीचे किंवा युतीचे. पुण्याचे पालकमंत्रीपद आपल्याच हाती राहील याची काळजी अजितदादांनी नेहमीच घेतलेली आहे. कधी आघाडी तर कधी युतीच्या सरकारमध्ये राहून उपमुख्यमंत्रीपदाचा विक्रम रचणाऱ्या अजित पवारांनी पुण्याच्या विकासात आतापर्यंत मोठा हातभार लावलेला आहे. केवळ बारामतीच नाही, तर पिंपरी-चिंचवड, पुणे शहर-उपनगराच्या विकासावर अजित पवारांचे अत्यंत बारीक लक्ष असते. मध्यंतरी चाकण औद्योगिक क्षेत्रातील वाहतूक कोंडीचा आढावा घेताना अजित पवारांनी अधिकाऱ्यांना रस्त्यावरील खड्ड्यांवरून लोकांच्या समक्ष झापले होते. अशा अजितदादांच्या मुलाला पुण्याच्या जमिनीत रस कसा बरे नसेल? तीन-चार महिन्यांपूर्वी या व्यवहाराची चर्चा कानावर पडताच असे चुकीचे व्यवहार मान्य नसल्याचे पार्थ पवारांनी सांगितले होते. तरीही त्यांनी हा व्यवहार पुढे रेटलाच. या जमीन व्यवहाराशी आपला दुरान्वयानेही संबंध नाही, व्यवहाराचा पत्ता पार्थ पवारांच्या बंगल्याचा आहे. मुले सज्ञान होतात तेव्हा त्यांचा व्यवसाय करतात, असे म्हणत सुरुवातीला प्रसार माध्यमांपासून पळ काढणाऱ्या अजित पवारांनी कानावर हात ठेवले. नंतर स्वतःच प्रसार माध्यमांपुढे येऊन जमीन व्यवहार रद्द झाल्याचे सांगितले. प्रत्यक्षात सोन्याच्या भावाने पुण्यातील जमिनी विकल्या जात असताना १,८०० कोटींची महार वतनाची जमीन ३०० कोटींच्या कवडीमोल दराने पार्थ पवारांच्या कंपनीला मिळणे. त्यावर सरकारकडून २१ कोटींचा मुद्रांक शुल्क माफ होणे, हे काही सहजासहजी घडलेले नाही.

भलेही या व्यवहारात थेटपणे अजित पवारांचा सहभाग नसला, तरी या व्यवहारांवर अजित पवारांच्या पदाचा प्रभाव सरळसरळ दिसून येतो. तळे राखी तो पाणी चाखी... यापुढे माझ्या नावाचा गैरवापर करून कुणी चुकीचे व्यवहार करत असेल तर अधिकाऱ्यांनी ते व्यवहार जागीच थांबवा, चुकीचे व्यवहार मला खपणार नाहीत, असे अजित पवारांनी म्हणणे म्हणजे एकप्रकारे गुन्ह्याची कबुली देणेच आहे. त्यामुळे व्यवहार झालाच नाही असे म्हणून अजित पवारांना जबाबदारी झटकता येणार नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाच्या चौकशीसाठी समिती नेमली आहे. पार्थ पवार वगळून तिघांवर या जमीन घोटाळ्यात गुन्हे नोंदवण्यात आले आहेत. यापैकी एकजण म्हणजे दिग्विजय पाटील हे पवार कुटुंबातलेच आहेत. पवारांचे घराणे हे राजकारण आणि उद्योग यांचा समतोल साधणारे घराणे म्हणून ओळखले जाते. काही वर्षांपूर्वी पार्थ पवारही वडिलांप्रमाणेच राजकारणात येण्यास इच्छुक होते. २०१९ मध्ये मावळमधून खासदारकीसाठी उभे राहिलेल्या पार्थ यांना मतदारांनी त्यावेळी जमिनीवर दाणकन आपटले होते. तेव्हापासून ते राजकीय व्यासपीठावर फारसे दिसले नाहीत आणि आता थेट जमीन घोटाळ्यामुळे चर्चेत आले. महाराष्ट्रातील सिंचन घोटाळ्याचा आरोप हा अजित पवारांच्या राजकीय कारकिर्दीवरचा मोठा डाग समजला जातो. या घोटाळ्याच्या आरोपांमुळे अजित पवार ईडी कोठडीत जाण्यापासून थोडक्यात बचावले होते. पार्थ पवारांनी अजितदादांची अर्धवट राहिलेली कसर भरून काढली नाही म्हणजे मिळवले.

## भाविकांची चेंगराचेंगरी



काही दिवसांपूर्वी आंध्र प्रदेशमधील श्रीकाकुलम जिल्ह्यात व्यंकटेश्वर मंदिरात एकादशीच्या पूजेदरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीत १२ भाविकांचा मृत्यू झाला. या दुर्घटनेचे कारण अरुंद प्रवेशद्वार, बांधकाम चालू असलेला परिसर आणि प्रशासकीय हलगर्जीपणा असल्याचे मानले जात आहे. देव मंदिरात बाराही महिने असतो. तो कुठेही जात नाही. भक्त कधीही ये-जा करू शकतात, देव 'भक्तीचा भुकेला' असतो, अशी ही कल्पना आहे. तरीही यात्रा, एकादशी, तिथीला मंदिरांमध्ये भक्तांची प्रचंड गर्दी होत असते. या गर्दीवर नियंत्रण मिळविताना कोणत्याही भागातील प्रशासनावर मयार्दा पडणे स्वाभाविकच असते. उपलब्ध जागेच्या क्षमतेपेक्षा अधिक गर्दी झाली, की चेंगराचेंगरी होणे स्वाभाविकच आहे. त्यातून अफवा, पुढे जाण्याची घाई, गर्दीमुळे निर्माण झालेला उकाडा, श्वास घेण्यासाठी होणारा त्रास व त्यातून पळापळ प्रसंगी एकमेकांना अक्षरशः तुडवतच गर्दी मार्गक्रमण करत असते. त्यातून मृत्यूकांड होते. काही काळ हळहळ व्यक्त केली जाते. चर्चांना उधाण येते, काही दिवसांनी पुन्हा 'ये रे माझ्या मागल्या' अशी स्थिती त्या ठिकाणी पाहावयास मिळते. ऑगस्ट २००३ मध्ये नाशिकच्या कुंभमेळ्यात झालेल्या चेंगराचेंगरीत ४१ यात्रेकरूंचा मृत्यू झाला होता. म्हणजे या घटना दक्षिण अथवा उत्तर भारतात घडतात, अशातला भाग नाही. काही वर्षांपूर्वी महाराष्ट्रात २००५ साली मांढरदेवी येथील काळुबाई देवस्थानाच्या ठिकाणीही अशा प्रकारची चेंगराचेंगरीची दुर्घटना घडली होती. त्या दुर्घटनेत तर जवळपास ३०० हून अधिक लोकांचा मृत्यू तर २५० हून अधिक लोक गंभीर जखमी झाले होते. दरवर्षी शाकंभरी पौर्णिमा मेळ्यानिमित्त काळुबाई मंदिरात लाखो भाविक जमतात. त्यावर्षी देवीला नारळ आणि बकरे अर्पण करण्यासाठी जवळजवळ दोन लाख लोक जमले होते, कोणीही अशा प्रकारची दुर्घटना घडावी अशी इच्छा केली नसती. मंदिरात फक्त स्टॉलने वेढलेल्या एका अरुंद गल्लीतून प्रवेश करता येतो. दुपारनंतर सुरू झालेल्या चेंगराचेंगरीमुळे, आतील गर्भगृहात जाणाऱ्या पायऱ्यांवर साचलेले नारळपाणी आणि दिव्याचे तेल निसरडे झाले. काही महिला पाय घसरून पडल्या आणि त्या तुडवल्या गेल्या. वरच्या विजेच्या तारा तुटल्या, ज्यामुळे लोकांमध्ये घबराट पसरली. इलेक्ट्रिक शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या आगीनंतर एलपीजी सिलिंडरचा स्फोट झाल्याने चेंगराचेंगरी झाली. परवाच्या व्यंकटेश्वर मंदिरातील दुर्घटनेचा आढावा घेतला असता, त्या घटनेतही अन्य घटनांच्या तुलनेत फारसे वेगळे काही दिसत नाही. व्यंकटेश्वर मंदिरात एकादशीच्या पूजेनिमित्त मंदिरात मोठ्या संख्येने भाविक जमा झाले होते. मंदिरात प्रवेश करण्याची व मंदिरातून बाहेर पडण्याची जागा अरुंद असून मंदिर परिसरात बांधकाम सुरू असल्याने ही दुर्घटना घडली. मंदिर संकुलाच्या प्रवेशद्वाराजवळ अचानक गर्दी वाढली, ज्यामुळे भाविकांमध्ये घबराट निर्माण झाली आणि चेंगराचेंगरीसदृश परिस्थिती निर्माण झाली. एकादशी हा हिंदू धर्मातील एक अत्यंत पवित्र दिवस आहे. याच पवित्र दिवशी व्यंकटेश्वर स्वामी मंदिरात हजारो भाविक दर्शनासाठी जमले होते. मात्र, पोलीस आणि मंदिर प्रशासनाकडून गर्दीवर नियंत्रण मिळवता आले नाही. त्यामुळे चेंगराचेंगरी होऊन भाविकांना आपला जीव गमावला. व्यंकटेश्वर मंदिरातील दुर्घटनेमुळे दक्षिण भारताला हादरा बसला असून अलीकडच्या काळात चेंगराचेंगरी, त्यातून घडणाऱ्या दुर्घटना आणि मृत्यूचे तांडव या घटना ठरावीक अंतरानी घडतच चालल्या आहेत.



# हे खायलाच हवं हा हट्ट वाढवू शकतो तुमच्या मुलांमधील लठ्ठपणा

आपल्या मुलाने निरोगी राहावं असं प्रत्येक आईला वाटतं. मुलं निरोगी राहण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करते. त्यांच्या आहारात पौष्टिकच गोष्टींचा समावेश करते. मुलांनी बाहेरचं न खाता घरात तयार केलेलं अन्न खावं यासाठी ती तळमळीने चांगले चांगले पदार्थ शिकते. मुलांना खाऊ घालते. पण तुमची हीच पौष्टिक आणि सतत चांगलं खाण्याची सवय तुमच्या मुलांच्या आरोग्यासाठी घातक आहे ती कशी ते आज आम्ही तुम्हाला सांगणार आहोत. त्यासाठी पुढे नक्की वाचा.

**सतत खायला देत राहणे**

आईचं मन फारच काळजीवाहू असतं. तिला आपल्याला मुलाने सतत खात राहावे असे वाटते. म्हणजे ती आल्यावरही विचारते तुला भूक लागली का? तुला काहीतरी खायला करुन देते. मग ही दिवसभरातील कोणतीही वेळ असो तिला तिच्या मुलाने सतत खावेसे असे वाटते. तुम्ही देखील आजुबाजुला अशी अनेक उदाहरणे पाहिली असतील ज्या ठिकाणी आई आपल्या मुलांना अगदी रात्रीही घरी परतल्यानंतर खाऊ घालतात. आता तुम्ही म्हणाल यात काय चुकलं? तर तुमच्या मुलांना आवश्यक असलेल्या गोष्टी तुम्ही त्यांना देणे चांगले पण त्यांना खायला देताना तुम्ही वेळ आणि काय खायला देत आहात हे देखील बघा. कारण बरेचदा आई आपल्या मुलाचे पोट भरावे म्हणून त्यांच्या क्षमतेपेक्षा अधिक खायला देतात.

**तुला हे खायलाच हवं**

आई आपल्या मुलांना चांगल ओळखते हे आम्हाला माहीत आहे. पण त्यांच्यावर खाण्याची जबरदस्ती करणेही चांगले नाही. तुमचं मुलं काल भरपूर जेवलं असेल म्हणून ते उद्या तितकचं जेवेल असं होत नाही. पण काही पालक मुलांच्या पानात अन्न वाढतात. त्यांना कधी कधी ते खाता येत नाही. अशावेळी काही पालक मुलांना जबरदस्ती करुन पानातील अन्न संपवायला लावतात. मुलं रडत असली तरी तुज्यासाठी हे आवश्यक आहे.तू हे खायलाचं हवे. असे सांगून आई इमोशनल ब्लॅकमेल करुन मुलांना खाऊ घालतात. पण हीच पालकांची चुकी आहे. वाढीच्या वयातील मुलांनी योग्य आहारा घ्यावा ही गोष्ट योग्य असली तरी खाण्याची जबरदस्ती तुम्हालाच पुढे त्रासदायक पडू शकते. गरजेपेक्षा जास्त जेवण जेवल्यामुळे मुलांना अपचनाचा त्रास होऊ शकतो किंवा त्यांचे वजनही वाढू शकते.

**सतत पौष्टिक पदार्थ देत राहणे**

आता काही आई अशा असतात ज्यांना आपल्या मुलांना कायमच पौष्टिक द्यायचे असते. अगदी सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत त्यांनी काय पौष्टिक खायला हवे याचे एक वेळापत्रकच त्यांनी तयार केलेले असते. त्यांच्या या वेळापत्रकानुसार मुलांनी ते खावे असेच त्यांना वाटते. काही पालक पौष्टिक लाडू बनवतात. यामध्ये वेगवेगळी पीठ, ड्रायफ्रुट असतात.या सगळ्याचे किती प्रमाण मुलांच्या आहारात असावे हे त्यांना कळत नाही. त्यांना असे वाटते की, इतके पौष्टिक घटक पोटात गेल्यानंतर मुलाचे आरोग्य चांगले राहील.पण असे होत नाही. तुमच्या या सतत खाण्याच्या वेळापत्रकामुळे मुलांमध्ये लठ्ठपणा वाढतो. शिवाय त्यांना अन्य आजार होण्याची शक्यता असते. मुलांना सगळ्यात जास्त आई ओळखते ही गोष्ट खरी असली तरी सुद्धा कधी कधी महिला भावनेच्या भरात आपला मुलगा काहीच खात नाही म्हणून त्याला खाऊ घालतात. तुम्हाला तुमचे मुलं कुपोषित आहे असे वाटत असेल तर डॉक्टरांकडे न्या. त्यांच्या उंचीनुसार त्यांचे वजन किती असायला हवे हे विचारुन घ्या. ती यादी जवळ बाळगा. कारण तुम्ही मुलांना त्यांच्या क्षमतेपेक्षा अधिक खाण्याची सवय लावली की, त्यांना आवरणे कठीण असते आणि त्यांच्या लठ्ठपणाला नियंत्रित ठेवणे फारच कठीण होऊन बसते.

# करु नका 'या' चुका, नाहीतर होईल पोटातील अल्सर!

पोटातील अल्सर बद्दल तुम्ही ऐकून असालच! जगातील अतिगंभीर आजारांपैकी एक आजार म्हणून पोटाचा अल्सर ओळखला जातो. जेव्हा काही खाताना अन्न नलिकेत जळजळ होणे वा वेदना होणे या गोष्टीचे लक्षण आहे की पोटामध्ये अल्सर वाढतो आहे. हे अल्सर अन्न नलिकेत किंवा आतड्यांच्या आतील भागांत तयार होतात. या स्थितीमध्ये रूग्णासाठी ठोस आहार तर दूरच राहिला पण त्याला साधे पाणी पिताना सुद्धा त्रास होतो. आज आपण याच आजाराबद्दल जाणून घेणार आहोत. अल्सर म्हणजे काय? ते कसे वाढतात? ते किती गंभीर असू शकतात? याचे काय काय तोटे आहेत आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे या आजारावर उपाय काय? या सर्व प्रश्नांची उत्तरे तुम्हाला आज या लेखामधून मिळतील.

**अल्सर म्हणजे काय?**

अल्सर म्हणजे पोटात होणाऱ्या जखमा होय. जेव्हा हे घाव आतड्यांत किंवा अन्न नलिकेमध्ये तयार होतात तेव्हा रुग्णाला काही खाताना वा पिताना खूप वेदना होतात आणि मोठा त्रास होतो. चावलेला कोणताही पदार्थ गिळताना सुद्धा अशी जाणीव होते जसे की काहीतरी आपला गळा चिरून आतमध्ये शिरत आहे. या स्थितीत रुग्ण साधं पाणी पिताना सुद्धा घाबरतो. कारण पाणी पिताना सुद्धा खूप जळजळ आणि वेदना होतात. पोटाच्या वेगवेगळ्या भागात होणाऱ्या अल्सरच्या आजराला वेगवेगळी नावे आहेत आणि हे अल्सर तयार होण्याची कारणे सुद्धा वेगवेगळी असतात. पोटात तयार होणाऱ्या अल्सरला गॅस्ट्रिक अल्सर आणि आतड्यांत होणाऱ्या अल्सरला डुओडिनल अल्सर म्हटले जाते.

**अल्सर होण्याची कारणे**

सहसा शरीरात अल्सर हा शरीरातील आम्ल वाढल्यामुळे होतो. आम्ल म्हणजे एक प्रकारचे ॲसिडच असते. पोटात ॲसिड बनते आपल्या चुकीच्या आहारामुळे! जेव्हा आपण खूप काळ आहारात गरम आणि मसालेदार पदार्थ खातो तेव्हा शरीरातील आम्ल वाढत जाते. कधी कधी एखादे औषध जास्त काळ घेतल्याने सुद्धा ही स्थिती उद्भवू शकते. कारण ते औषध गरम असते. हे आम्ल आपल्या पचनतंत्राला हानी पोहचवून जखमा करते. काही धोकादायक जीवजंतू सुद्धा पोटात गेल्याने अल्सर तयार होतो.

**या कारणामुळे होतो अल्सर**

आतापर्यंत आपण हे जाणून घेतले की अल्सर हा सामान्यतः चुकीच्या आहार पद्धतीमुळे होतो किंवा पोटात जंतू गेल्यामुळे होतो. पण काहींची खूप धुम्रपानं करण्याची सवय, अति प्रमाणात मद्यपान किंवा खूप काळ मानसिक ताण घेऊ जगण्याची सवय सुद्धा अल्सरला कारणीभूत ठरू शकते. सध्या तरुणांमध्ये वाढत्या अल्सरच्या प्रमाणाला हीच कारणे जबाबदार असल्याचे जाणकार सांगतात. त्यामुळे या गोष्टी शक्य तितक्या टाळाव्यात आणि अल्सर पासून सुरक्षित राहावे.

**अल्सर होण्याची लक्षणे काय आहेत?**

एक कारण तर तुम्हाला लेखाच्या सुरुवातीलाच कळलं की अल्सर असणाऱ्या व्यक्तीला काहीही खाता पिताना खूप त्रास होतो. साधं पाणी सुद्धा पिता येत नाही. त्यामुळे हा त्रास जाणवू लागल्यास अल्सर असण्याची शक्यता वाढते. या वेदनेमुळे रुग्ण काही खाऊ शकत नाही आणि काहीच न खाल्ल्याने पोटात जास्त ॲसिड तयार होऊ लागते आणि ही समस्या अधिक वेदनादायी होते. पोटात अल्सर आल्यास वारंवार आंबट ढेकर येऊ लागतात. कधी कधी उलटी होते तर कधी कधी अचानक पोटात वेदना सुरु होतात. याशिवाय थकवा जाणवणे, चक्कर येणे यांसारख्या समस्या सुद्धा सुरु होतात.

**अल्सरवर उपाय काय आहेत?**

अल्सर ठीक करण्यासाठी सर्वात प्रथम म्हणजे आहारात बदल करावा लागतो. याबाबत तुम्ही अनुभवी आणि तज्ञ डॉक्टरांचाच सल्ला घ्यावा. ते तुम्हाला याबाबतीत योग्य मार्गदर्शन करू शकतील. कारण अल्सरचे प्रमाण किती आहे त्यानुसार डॉक्टर आहार ठरवून देतात. आहार तयार करताना तुम्ही कोणत्या वातावरणात राहता, आसपास स्थिती कशी आहे यासारख्या गोष्टी सुद्धा डॉक्टरांना पाहाव्या लागतात. सध्या अल्सरवर अनेक औषधे आली आहेत जी शरीरातील आम्लाचे प्रमाण कमी करतात आणि अल्सर हळूहळू ठीक होऊ लागतो. ज्यांचा अल्सर अधिक गंभीर झाला आहे त्यांच्यावर ऑपरेशन करूनच उपचार करावे लागतात.



# त्वचेसाठी वरदान आहे कडुनिंब



**कडुनिंब**

कडुनिंबाला आयुवेर्दात खूपच मोलाचं स्थान आहे. या झाडाच्या मुळांपासून ते फुलांपर्यंत सगळ्यात औषधी गुणधर्म असल्यानं त्याला वृक्ष औषधालय असंही म्हटलं जातं. विशेष म्हणजे ज्यांना आपल्या त्वचेचं सौंदर्य खुलवायचं असेल त्यांच्यासाठी कडुनिंब म्हणजे वरदान होय.

**रक्त शुद्ध होते**

रक्त शुद्ध करण्यासाठीही कडुनिंबाचा उपयोग होतो. रक्त शुद्ध झाल्यानं त्वचेच्या अनेक समस्या या दूर होतात.

**मुरुम, पुरळ दूर होते**

कडुनिंबाच्या पानात बुरशीनाशक व जंतुनाशक गुण आहेत. त्यामुळे चेहऱ्यावर आलेले मुरुम, पुरळ यामुळे दूर होतात. त्यामुळे सौंदर्यप्रधानांपेक्षा मुरुम दूर करण्यासाठी कडुनिंब हे अधिक फायदेशीर असतं.

**त्वचा रोगावर रामबाण**

कडुनिंब तेलात फॅटी ॲसिड व ई जीवनसत्त्व आहेत त्यामुळे खरुज, नायटा यांसारख्या व्याधी सहज बऱ्या होतात.

**केसांच्या आरोग्यासाठीही उत्तम**

कडुनिंबाच्या पानांची पेस्ट ही केसांसाठी उत्तम कंडिशनर आहे. त्याचप्रमाणे कडुनिंबाची पानं उकळवून त्या पाण्यानं केस धुतल्यास घामामुळे येणारे खाज दूर होते. तसेच कोंड्याची समस्याही निघून जाते.

# साधू,संतांचे जीवन खडतर

सर्वसामान्य माणूस आणि संत किंवा महापुरुष यांच्या जीवन जगण्याच्या पध्दतीत फरक आहे. संतांचे जीवन खडतर असते ते काटेकोरपणाने नियमांचे पालन करतात म्हणूनच निश्चित केलेल्या ध्येयापर्यंत पोहोचतात. साधूंना पूर्व जीवनाचा परिचय देण्याची अनुमती नसते. साधूंचे जीवन संयमधारी असते. स्वतः खडतर जीवन जगून सर्वसामान्यांच्या आयुष्यात प्रकाश देण्याचा त्यांचा प्रयत्न असतो.

भौतिक सुखापासून ते सतत दूर असतात. सर्वसंग परित्याग करुन संत, साधू आत्मिक सुखाचा मार्ग शोधतात. जीवनात आचारसंहिता पाळली तरच जीवन योग्य मार्गावर चालते. साधू संतांच्या आचार-विचारावर नेहमी चर्चा होते. सम्यक दृष्टीने साधू जीवन जगतात, जीवनात शिस्त पाहिजे म्हणजे आयुष्याचा खरा अर्थ समजतो. सर्वसामान्य माणूस जर धर्मानुसार वागला तर समाज बदलण्यास वेळ लागणार नाही. संतांच्या जीवनाचा अभ्यास करा. मगच त्यांच्या संदभार्नुसार वागायचा प्रयत्न करा. संत आणि सामान्य माणूस यांच्यात जमीन अस्मानचे अंतर आहे. नराचा नारायण व्हायचा असेल तर जीवनाला शिस्त लावलीच पाहिजे. कठोर साधनेशिवाय कोणतीही ध्येयपूर्ती, लक्ष प्राप्ती होत नाही. मनावर ताबा ठेवण्यातच प्रत्येकाचे हीत आहे. चातुर्मासात साधना केल्यामुळे मानसिक शांतता लाभते. आत्मिक व शरीर शुध्दीचा अनुभव मिळतो. साधूंवर काही बंधने असतात.

भोगाने नाही तर योगाने माणूस यशस्वी जीवनाकडे वाटचाल करु शकतो. प्रत्येकाने प्रत्येक संकटाचा खंबीर मुकाबला करुन जीवन जगण्याचा प्रयत्न केला पाहिजे. लाच घेण्याची प्रवृत्ती नष्ट झाली तर भ्रष्टाचाराचा समूळ नायनाट होईल. कायदा पायदळी तुडविण्याच्या वृत्तीला अटकाव घालण्याची गरज आहे.

**महापुरुषांचे जीवन प्रेरणादायी असते**


श्रावण महिना हा वर्षातील अतिशय चांगला महिना आहे. कधी पाऊस, कधी ऊन अशी निसर्गाची रुपे आपणास पाहता येतात. श्रावण महिना सर्वांनाच आकर्षित करतो. सूर्य अंधाराला दूर करतो. फुल देखील सुगंध देते. महापुरुषांचे जीवन देखील प्रेरणादायी असते. समाजाला योग्य मार्गावर चालण्यासाठी मदत करते.

महापुरुष लोककल्याणाचे कार्य करतात. स्व.पू श्री अमृतकंवरजी महाराजांचे श्रीरामपूरशी जवळचे नाते आहे. त्यांनी अंतिम श्वास श्रीरामपूरात घेतला. त्यांचा स्वभाव श्रीफळ (नारळ) प्रमाणे होता. वरुन कडकपण आतून मऊ, पौष्टीक होता. त्यांच्या वास्तव्याने श्रीरामपूर पुण्यभूमी ठरली आहे.

# योगसाधनेने मिळवा सुंदर त्वचा



भगवान योग केल्याने शरीराला अनेक फायदे होतात. त्यासोबतच त्वचा आणि केसांनाही याचा फायदा होतो. सुंदर त्वचा आणि चमकत्या केसांसाठी प्राणायम सर्वात महत्त्वपूर्ण मानलं जातं. यामुळे ताण कमी होतो. रक्तात ऑक्सिजनचं प्रमाण वाढून रक्ताभिसरण सुरळित होण्यास मदत होते. योगासनांमुळे शारीरिक, मानसिक स्वास्थ उत्तम राहतं. नाडी तंत्र सुरळित होतं. मानसिक तणावापासून मुक्ती मिळण्यास मदत होते. सौंदर्यासाठी योग आवश्यक आहे. योगमुळे शरीराला पर्याप्त मात्रामध्ये पोषाहार प्राप्त होतो. योगमुळे त्वचेमध्ये असणारे विषारी द्रव्य बाहेर काढण्यास मदत होते. योगासनांमुळे त्वचेला ऑक्सिजन मिळण्यास मदत होते. त्वचा रोगांपासून मुक्ती मिळण्यास मदत होते. ही प्रक्रिया केसांसाठीही लागू होते. जेव्हा एखाद्याला तणाव वाटतो, त्यावेळी मस्तिष्क, रक्तात एड्रेनालाइन सोडतं. एड्रेनालाइनमुळे हृदयाचे ठोके जलद होतात. त्यामुळे ब्लड प्रेशर वाढतं. सतत तणावात राहिल्याने हृदयाशी संबंधी समस्यांचा धोका वाढतो. जे लोक अधिक तणावात राहतात, त्यांना इतरांच्या तुलनेत हृदय रोग होण्याची शक्यता अधिक असते. दररोज योग केल्यास ताण-तणावापासून दूर राहण्यास मदत होते. दरवर्षी आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा केला जातो. लोकांमध्ये योगप्रति जागरुकता निर्माण करणं हा जागतिक योग दिवस साजरा करण्यामागचा उद्देश आहे. यावर्षी १ ते ७ मार्च २०२० हा आठवडा योग सप्ताह म्हणून साजरा करण्यात येत आहे.



# मधुमेहामुळे या महत्त्वाच्या अवयवांवर होतो दुष्परिणाम

मधुमेह किंवा डायबेटिस हा बदललेल्या जीवनशैलीमुळे होणाऱ्या विविध आजारांपैकी एक आहे. मधुमेहाच्या विळख्याने आपणा भारतीयांना अक्षरशः गिळंकृत केलेले आहे. मधुमेहाचे, टाइप-१ आणि टाइप-२ असे दोन प्रकार आहेत. टाइप-१ या प्रकारात शरीरात इन्सुलीन स्त्रवत नाही किंवा ते अत्यंत कमी प्रमाणात स्त्रवते. हे रुग्ण इन्सुलीनच्या इंजेक्शनशिवाय जगू शकत नाही. टाइप-२ या प्रकारात इन्सुलीन कमी प्रमाणात स्त्रवते, पण या रुग्णांमध्ये गोळ्यांमुळे मधुमेह आटोक्यात येऊ शकतो.

**मधुमेहाची कारणे :** आई, वडील किंवा कुटुंबातील सदस्यांना मधुमेह असेल तर मुलांना होण्याची शक्यता जास्त असते. मधुमेहाची सुरुवात साधारणपणे ४० ते ५० या वयादरम्यान होते. लठ्ठ व्यक्तींना लठ्ठपणाबरोबर ब्लडप्रेशर आणि कोलेस्ट्रॉल जास्त असेल तर त्यांना मधुमेह होण्याची शक्यता जास्त असते.

**दुष्परिणाम टाळण्यासाठी उपाय :** शरीरातील कोलेस्ट्रॉल आटोक्यात ठेवण्यासाठी स्निग्ध पदार्थांचे सेवन कमी करावे. गरज भासल्यास औषधे घ्यावीत. वेळोवेळी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. त्यांनी सांगितलेल्या तपासण्या कराव्यात. हे सर्व केल्यास एकतर तुम्ही मधुमेह होण्यापासून स्वतःचा बचाव करू शकता किंवा मधुमेह झाल्यास त्याची नीट काळजी घेऊन त्यापासून होणारे वाईट परिणाम टाळू शकता.

मधुमेहाची लक्षणे : भूक लागणे, तहान जास्त लागणे, लघवी जास्त लागणे, जखम लवकर बरी न होणे, पायांमध्ये मुंग्या येणे, लघवीमध्ये जळजळ होणे, योनीमार्गाचे इन्फेक्शन होणे, थकवा वाटणे, गोड जास्त खाण्याची इच्छा होणे ही मधुमेहाची लक्षणे आहेत. काही वेळा मधुमेह हा ऑपरेशनपूर्वी करावयाच्या शुगर टेस्टमुळे समजतो. मधुमेह शरीरातील एकूण एक अवयवांवर परिणाम करतो. यात प्रामुख्याने किडनी, हृदय, रेटिना, पायातील नसा, पायाला रक्तपुरवठा करणाऱ्या वाहिन्या या अवयवांवर जास्त परिणाम होतात.

**रक्त शर्करचे प्रमाण किती असावे?**

मधुमेहामध्ये सतत वाढलेल्या साखरेच्या प्रमाणामुळे सगळ्या महत्त्वाच्या अवयवांवर परिणाम होऊन त्याचे विकार उद्भवतात. साधारणतः आठ ते दहा तास उपाशीपोटी राहून केली जाणारी शुगर टेस्ट म्हणजे 'फास्टिंग ब्लड शुगर'. ती ब्लड शुगर शंभरपेक्षा कमी हवी. जेवणानंतर दोन तासांनी केलेली ब्लड शुगर १४०पेक्षा कमी हवी. यापेक्षा ब्लड शुगर जास्त असेल तर मधुमेहाची शक्यता जास्त असते.

**प्रतिबंधात्मक उपाय :** जास्त गोड खाल्ल्याने मधुमेह होतो अशी लोकांची धारणा असते, तर तसे नाही. मधुमेह झाला तर गोड खाऊ नये हे तत्त्व आहे. सात्विक आहार घ्यावा. भूक नसल्यास खाऊ नये. जेवणातील तळलेल्या पदार्थांचे प्रमाण कमी करावे. नियमितपणे व्यायाम करावा. रोज ३०-४५ मिनिटे चालणे हा एक सहजसोपा व्यायाम आहे. हे करताना नेमकी गती पाळली पाहिजे. जवळपास जाताना पायीच जावे.



# शिळा भात खाण्याचे आरोग्यदायी फायदे

अनेक जणांना भात खाण्याची भीती असते. कारण भात खाल्याने वजन वाढण्याची भीती असते. परंतु, हाच भात आरोग्यास देखील तितकाच लाभदायक आहे. त्यामध्ये जर शिळा भात खात असाल तर अति उत्तम. कारण शिळा भात हा आरोग्यास लाभदायी आहे. जाणून घेऊया शिळा भात खाण्याचे आरोग्यदायी फायदे.

शरीराचे तापमान नियंत्रित राहते - शिळा भात खाल्याने शरीर थंड राहते. त्यामुळे रोज जर शिळा भात खाल्ला तर तुमच्या शरीराचे तापमान देखील नियंत्रणात राहण्यास मदत होते.

बद्धकोष्टतेची तक्रार दूर होते - भातात भरपूर प्रमाणात फाइबर्सचे प्रमाण असते. त्यामुळे शिळा भात खाल्ल्यास त्याचा अधिक फायदा होतो आणि बद्धकोष्टतेची तक्रार दूर होते.

चहा, कॉफी पिण्याची सवय मोडेल - बऱ्याच जणांना चहा आणि कॉफीचे सेवन करायची सवय असते. ही सवय सोडण्यासाठी अनेक प्रयत्न देखील केले जाता. मात्र, तरी देखील सवय मोडत नाही. अशावेळी जर तुम्ही सकाळी भाताचे सेवन केल्यास तुमची ही सवय मोडण्यास मदत होते.

ताजेतवाने रहाल - शिळा भात तुम्हाला ताजेतवाने ठेवण्यास मदत करतो. यामुळे दिवसभर काम करण्याची ऊर्जा देखील मिळण्यास मदत होते.

अल्सरची समस्या होईल दूर - तुम्हाला जर अल्सरचा त्रास असेल तर आठवड्यातून तीनवेळा शिळ्या भाताचे सेवन करावे. यामुळे तुमची अल्सरची समस्या दूर होण्यास मदत होईल.



# अशी घ्या काळजी अंडी खाताना

सर्वसामान्य संडे हो या मंडे रोज खाओ अंडे असं म्हटलं जातं. तसेच व्हिटामिन ए , डी बरोबरच मुबलक प्रोटीन्स असलेली अंडी तब्येतीसाठी उत्तम असली तरी ती पचायला उष्ण असतात. त्यामुळे अंड्याचे पदार्थ खाताना काय काळजी घ्यावी याची माहीती असणं आवश्यक आहे, अन्यथा अंडी अंगी लागण्याएवजी अंगाशी येण्याची शक्यता आहे. त्यासाठीच या काही खास टिप्स. अंड खाताना एकतर ते पूर्ण शिजलेले असावे किवां पूर्ण कच्चे असावे. अर्धे कच्चे किंवा अर्धे शिजलेले अंड तुम्हाला त्रासदायक ठरू शकते. अर्ध शिजलेली अंडी खाल्ल्याने पोटाच्या समस्या, उलटी होणे, शरिराला सूज येणे किंवा अस्वस्थ वाटणे यासारख्या समस्या उद्भवू शकतात. हृद्यरोगाचा त्रास असणाऱ्या व्यक्तिंनीही अंड्यातील बलक खाणं टाळावं. त्यामुळे रक्तवाहिन्यांमध्ये चरबी वाढून शारीरिक समस्या निर्माण होण्याची शक्यता असते. जर तुम्हाला हाय ब्लड-प्रेशर किंवा डायबीटीसचा त्रास असेल तर अंड्यातील सफेद भाग खावा. अंड्यातीस पिवळा भाग खाणे हानिकारक ठरू शकते. एका संशोधनानुसार अंड्याचे अधिक सेवन केल्याने प्रोटेस्ट कॅन्सर होण्याची शक्यता असते. त्यामुळे अंडी खाताना या सर्व गोष्टींची काळजी घेणे गरजेचे आहे.

# रोगप्रतिकार शक्ती वाढवण्यासाठी आहारात करा या मसाल्यांचा वापर

भारतीय खाद्यपदार्थांमध्ये निरनिराळ्या मसाल्यांचा वापर केला जातो. या मसाल्यांच्या वापरामुळे खाद्यपदार्थांना विशिष्ठ चव येते. भाजीच्या वाटणात आणि फोडणीसाठी वापरण्यात येणारे हे मसाले खाद्यपदार्थांना रूचकर करतात. ज्यामुळे प्रत्येक गृहिणीच्या स्वयंपाकघरात या गरम मसाल्यांना विशिष्ठ स्थान असते. एवढंच नाही तर या मसाल्यांचा तुमच्या आरोग्यावरही चांगला परिणाम होतो. तुमच्या स्वयंपाकघरातील मसाल्यांचा डब्यातील हळद, जिरे, दालचिनी, काळमिरी आणि ओवा यासारखे काही विशिष्ठ मसाले तुम्हाला रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी नक्कीच उपयुक्त ठरू शकतात. म्हणूनच आजारपण आणि इनफेक्शनपासून दूर राहण्यासाठी आहारात या मसाल्यांचा वापर जरूर करा.

दालचिनी - दालचिनीमध्ये भरपूर प्रमाणात ॲंटिऑक्सिडंट असतात. ज्यामुळे सुगंधासोबत दालचिनी तुमच्या जेवणाला हेल्दी देखील करत असते. अनेक ॲलोपॅथी आणि आयुर्वेदिक औषधांमध्ये दालचिनीचा वापर केला जातो. दालचिनीमध्ये कॅन्सरपासून बचाव करणारे गुणधर्म असतात. शिवाय यामुळे मधुमेह नियंत्रणात ठेवण्यास मदत होते. दालचिनीचा वापर आहारात केल्यामुळे तुमच्या हृदयाचे कार्य सुरळीत सुरू राहते. मेंदूचे आरोग्य उत्तम राखण्यासाठी आणि कोलेस्ट्रॉल कमी करण्यासाठी दालचिनी फायदेशीर ठरते. म्हणूनच आजारपणापासून दूर राहण्यासाठी आहारात दालचिनीचा वापर जरूर करा.

हळद - हळद हा भारतातील असा एक मसाला आहे ज्याचा वापर प्राचीन काळापासून औषधाप्रमाणे केला जातो. हळदीमुळे रोगप्रतिकारशक्ती वाढण्यास मदत होते. म्हणून आजारपणातून बरे होण्यासाठी हळदीचे दूध घेण्याचा सल्ला दिला जातो. हळदीमध्ये ॲंटि ऑक्सिडंट भरपूर प्रमाणात असतात. यासाठीच जर तुम्हाला इनफेक्शनची भिती वाटत असेल तर आहारात हळदीचा वापर करण्यास मुळीच विसरू नका. सर्दी- खोकल्यावर मधातून हळदीचे चाटण घेतल्यास नक्कीच बरे वाटते.

जिरे - जिऱ्यामध्ये भरपूर प्रमाणात मॅग्नेशियम आणि लोह असतं. यासाठीच आहारात जिऱ्याचा वापर करणं फार गरजेचं आहे. जिऱ्याची फोडणी दिलेले खाद्यपदार्थ खाण्यामुळे तुमचे आरोग्य उत्तम राहण्यास मदत होते. गर्भवती महिला, स्तनपान देणाऱ्या महिला, आजारी माणसे, लहान मुले यांच्या आहारात जिऱ्याचा वापर जरूर करा. अपचनाचा त्रास होत असेल तर पाण्यातून जिरे पावडर घेतल्यामुळे पोट साफ होण्यास मदत होते. याचप्रमाणे श्वसनाच्या समस्या आणि संसर्गजन्य रोगांपासून दूर राहण्यासाठी जिरे फारच गुणकारी आहे.

जायफळ - बऱ्याचदा एखाद्या गोड पदार्थाला सुंगध देण्यासाठी जायफळाची पावडर वरून भुरभुरली जाते. जायफळामुळे शरीरातील फायबर्सवर नियंत्रण ठेवण्यास मदत होते. शिवाय यामुळे तुमची पचनक्रिया सुधारण्यास मदत होते. दातांच्या समस्या असल्यास जायफळाची पावडर पाण्यात मिसळून चूळ भरण्याचा सल्ला दिला जातो. कारण त्यामुळे दातांची कीड कमी होते. सर्दी, खोकल्यासारख्या संसर्गजन्य रोगांना दूर ठेवण्यासाठी जायफळाचा वापर केला जातो. म्हणूनच इनफेक्शनपासून दूर राहण्यासाठी आणि रोगप्रतिकार शक्ती वाढवण्यासाठी आहारात जायफळाचा वापर अवश्य करा.

ओवा - ओवा हा एक असा मसाल्याचा पदार्थ आहे ज्यामध्ये अनेक पाचक गुणधर्म असतात. ओवा चवीला तिखट, कडवट आणि आंबट असतो. ओव्यामध्ये लोह, कॅल्शियम, पोटॅशियम, आयोडीन, कॅरोटीन असते. शिवाय यामध्ये फायबर, काबोर्हायड्रेट, प्रोटीन्सदेखील काही प्रमाणात असतात. ओव्यामधील थायमॉल या जंतूनाशक घटकांमुळे वातावरण शुद्ध होते. त्यामुळे ओव्याचा नैसर्गिक औषध म्हणून वापर केला जातो. भारतीय खाद्यसंस्कृतीमध्ये अनेक पदार्थांमध्ये ओवा आवर्जून वापरला जातो. कारण त्यामुळे पदार्थ रुचकर होतात.

काळीमिरी - काळीमिरीचा वापर अनेक खाद्यपदार्थांमध्ये आवर्जून केला जातो. कारण यामुळे तुमची पचनसंस्था सुरळीत राहते. काळीमिरी हा एक उष्ण गुणधर्म असलेला गरम मसाला आहे. ज्यामुळे तुमचे अनेक आजारपणांपासून संरक्षण होऊ शकते. शिवाय यातील बीटा कॅरेटिन, व्हिटॅमिन ए आणि सी मुळे तुमची रोगप्रतिकारशक्ती देखील वाढते. म्हणूनच आजारपणांपासून दूर राहण्यासाठी आहाराच काळीमिरीचा वापर अवश्य करा.

हिंग - भारतीय स्वयंपाकाघरात हिंगाची डबी असतेच. हिंग निरनिराळ्या भाज्या, डाळी, खिचडीच्या फोडणीसाठी वापरलं जातं. हिंगामुळे पदार्थाला विशिष्ठ चव येते. हिंग केवळ स्वादासाठीच फोडणीत वापरलं जातं असं नाही तर त्यामागे खूप मोठं आहारशास्त्रदेखीलआहे. हिंग वापरल्यामुळे त्या पदार्थांची चव आणि पोषणमुल्यं दोन्ही वाढतात. शिवाय हिंग वापरल्यामुळे अनेक विकार तुमच्यापासून दूर राहतात. वातावरणातील बदल आणि वाढणारे प्रदूषण याचा परिणाम शरीरावर होत असतो. वातावरणातील बदलांमुळे आजकाल वारंवार सर्दी-खोकला यासारखे संसर्गजन्य आजारांचा सामना करावा लागत असतो. मात्र जर तुम्हाला सतत सर्दी, खोकला होत असेल तर तुम्ही हिंगाचा वापर करून त्यापासून सुटका मिळवू शकता. हिंग, मध आणि आल्याचा रस एकत्र करून त्याचे चाटण घेतल्याने तुम्हाला नक्कीच आराम मिळू शकतो.

# दहिसर टोलनाक्यासाठी १३ नोव्हेंबरची डेडलाईन

## नाही हटवला तर मीच उखडून टाकीन, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे निर्देश

**पाहणीदरम्यान सरनाईकांना विरोध**

**टोलनाक्याचे स्थलांतर करण्यासाठी वरसावे खाडीपूल पलीकडील वसई परिसराची पाहणी करण्यासाठी सरनाईक हे अधिकाऱ्यांसह गेले असता, काँग्रेसचे विजय पाटील, त्यांचे पुतणे सुशांत पाटील आणि इतर काही नागरिकांनी विरोध दर्शवला. 'राष्ट्रीय महामार्गावर मुंबईचा प्रवेशबिंदू असलेला टोलनाका वसईत कसा काय आणणार? येथील रस्त्यांची दुरवस्था आणि वाहतूककोंडीमुळे लोक आधीच त्रस्त आहेत. मुंबईचा टोलनाका येथे मान्य होणार नाही,' असा इशारा त्यांनी दिला.**

■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

दहिसर टोलनाका महामार्गावर स्थलांतरित करण्यास भाजपाने विरोध व्यक्त केलेला असताना, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी शनिवारी दहिसर टोलनाक्याची पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांना १३ नोव्हेंबरपर्यंत टोलनाका हटवण्याची अंतिम मुदत दिली. या मुदतीत कारवाई न झाल्यास 'टोलनाका स्वतः उखडून टाकीन,' असा कडक इशारा त्यांनी दिला. दहिसर टोलनाक्यावरून निर्माण होणारी वाहतूककोंडी ही गंभीर समस्या बनली आहे. ही समस्या दूर करण्यासाठी टोलनाक्याचे स्थलांतर करण्याची मागणी करण्यात आली होती. त्या अनुषंगाने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही संबंधित अधिकाऱ्यांना टोलनाका स्थलांतरित करण्याचे निर्देश दिले आहेत. पर्याय म्हणून वरसावे महामार्ग किंवा खाडी पुलाच्या पलीकडे टोलनाका नेण्याचा प्रस्ताव समोर आला. मात्र मीरा-भाईंदर भाजपसह वनमंत्री गणेश नाईक यांनी याला सार्वजनिकरित्या विरोध दर्शवला आहे. परिणामी या विषयावर शिवसेना शिंदे गट आणि भाजप यांच्यात संघर्ष उभा राहिला आहे. शनिवारी सकाळी मंत्री सरनाईक यांनी दहिसर टोलनाक्याची प्रत्यक्ष पाहणी केली. या वेळी मुंबई पोलीस, महापालिका, राज्य रस्ते विकास महामंडळ, मीरा-भाईंदर



महापालिका, वाहतूक विभाग तसेच टोल ठेकेदार कंपनीचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. तथापि, त्यांच्या आदेशानंतरही प्रत्यक्षात केवळ एका बाजूची फ्रेम काढण्यापलीकडे इतर काहीही काम झाले नसल्याचे पाहणीदरम्यान लक्षात आले. काही अधिकाऱ्यांनी अतिरिक्त मुदत मागितल्यावर सरनाईक तीव्र नाराजी व्यक्त करत म्हणाले, 'मी १३ नोव्हेंबर रोजी पुन्हा पाहणीस येईन. त्यावेळी ही स्थितीच दिसली तर टोलनाका मी स्वतः तोडून टाकेन.'

**वाहनांसाठी रस्ता खुला करा**

मुंबईकडे जाणाऱ्या मार्गिकेवरील टोलनाक्याजवळील डिव्हायडर काढून वाहनांसाठी रस्ता खुला करण्याचे आदेश सरनाईक यांनी दिले. तसेच रस्त्यात ठेवलेली क्रेन, बाकडी इत्यादी वस्तू हटवून मार्ग पूर्णपणे मोकळा करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. याशिवाय टोलनाक्यावरील अनावश्यक जाहिरातफलक, फ्रेम, अवजड लोखंडी खांब, अतिरिक्त बूथ इत्यादी हटवून केवळ वाणिज्य वाहनांसाठी आवश्यक तेवढे बूथ ठेवण्याचेही आदेश त्यांनी संबंधितांना दिले. मुंबईहून मीरा-भाईंदरकडे येणाऱ्या मार्गावरील टोलनाका पुढे ढकलण्याचेही त्यांनी स्पष्टपणे सांगितले.

# अटल सेतूवरील मेगा दुरुस्तीला सुरुवात

## र्जा व टिकाऊपणा राखण्यासाठी एमएमआरडीएचा मोठा निर्णय

■**उरण। प्रतिनिधी,**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) 'अटल बिहारी वाजपेयी शिवडी-न्हावा शेवा अटल सेतू'वर पृष्ठभाग नूतनीकरण आणि पेव्हमेंट पुनर्बांधणीची मोठी कामे हाती घेतली आहेत. सेतूची दीर्घकालीन मजबुती कायम राहावी आणि प्रवाशांना अधिक सुरक्षित, आरामदायी अनुभव मिळावा यासाठी हे महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. या उपक्रमामुळे सेतूची जागतिक दर्जाची गुणवत्ता आणि टिकाऊपणा कायम राखण्यास मदत होणार आहे.

कामादरम्यान वाहतूक पूर्णपणे बंद न करता, दुरुस्ती टप्प्याटप्प्याने केली जात आहे. पहिल्या टप्प्यात तिसऱ्या आणि चौथ्या मार्गिकांवर (लेन्सवर) पृष्ठभाग पुनर्बांधणीची कामे सुरू आहेत. त्यानंतर उर्वरित दोन मार्गिकांवर काम करण्यात येईल. नवी मुंबईकडे जाणाऱ्या मार्गावरील बाहेरील मार्गिकांमध्ये विशेषतः अवजड वाहनांसाठी असलेल्या ठिकाणी पृष्ठभागाची झीज आढळून आल्यानंतर एमएमआरडीएने सखोल तांत्रिक तपासणी केली होती.

पावसाळ्यात वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी मास्टिक ॲस्फाल्टचा वापर करून तात्पुरती दुरुस्ती आधीच करण्यात आली होती. आता पावसाळा संपल्यानंतर पूर्ण क्षमतेने पृष्ठभाग नूतनीकरणाच्या कायमस्वरूपी कामांना सुरुवात झाली आहे. दुरुस्तीच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड होऊ नये, म्हणून एमएमआरडीए विशेष दक्षता घेत आहे.



**एमएमआरडीएचा विश्वास**

प्रकल्पासाठी वापरले जाणारे साहित्य, मिश्रण रचना आणि जागेवरील कामकाज यांची पडताळणी आयआयटी मुंबईच्या तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली केली जात आहे. प्रकल्प अद्याप ह्यदोषदायित्व कालावधीह्न असल्यामुळे संपूर्ण नूतनीकरणाचा खर्च संबंधित कंत्राटदाराकडूनच उचलला जाणार आहे. या कामांमुळे देशातील सर्वात लांब सागरी सेतूवर प्रवास अधिक सुरक्षित, अखंड आणि सुखकर होईल, असा विश्वास एमएमआरडीएने व्यक्त केला आहे.

# कुंभमेळ्याच्या निमित्ताने महाराष्ट्र बॅण्डिंगची संधी

## विकासकामांना गती देण्याचे मुख्य सचिवांचे निर्देश

■**नाशिक। प्रतिनिधी,**

२०२७ मध्ये होणारा सिंहस्थ कुंभमेळा हा नाशिकसह संपूर्ण महाराष्ट्राचे ग्लोबल ब्रेण्डिंग करण्याची मोठी संधी आहे. या निमित्ताने धार्मिक, आध्यात्मिक आणि ऐतिहासिक पर्यटनाला चालना मिळून रोजगारनिर्मिती वाढण्यास मदत होणार आहे. महाराष्ट्राची संस्कृती आणि परंपरा जागतिक स्तरावर प्रदर्शित करण्यासाठी प्रत्येक विभागाने सूक्ष्म नियोजन करून काम करावे, तसेच कुंभमेळ्यासाठी सुरू असलेल्या विकासकामांना गती द्यावी, असे निर्देश राज्याचे मुख्य सचिव राजेशकुमार यांनी दिले. विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस नगरविकासाचे अपर मुख्य सचिव गोविंदराज, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, नियोजन विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, गृह विभागाचे विशेष प्रधान सचिव अनुपकुमार, विभागीय आयुक्त व कुंभमेळा विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ. प्रवीण गेडाम, विभागीय रेल्वे व्यवस्थापक पुनीत अग्रवाल, ठाणे विभागाचे विशेष पोलिस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे, प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह, एनएमआरडीएचे मुख्य कार्यकारी अधिकारी जलज शर्मा, नाशिक महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, पंचायत समितीचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार, पोलिस अधीक्षक बाळासाहेब पाटील, पोलीस उपायुक्त किरणकुमार चव्हाण आदी उपस्थित होते.



**सुरक्षा व्यवस्थेसाठी आगाऊ आराखडा**

कुंभमेळ्यादरम्यान पर्वणीचे दिवस आणि इतर कालावधीत पुरेसा पोलीस बंदोबस्त ठेवण्यासाठी पूर्वनियोजन करावे. संभाव्य अडचणी लक्षात घेऊन आपत्ती व्यवस्थापन आराखडा अद्ययावत करावा आणि आवश्यक साधनसामग्री तसेच मनुष्यबळ उपलब्ध ठेवावे, असे निर्देश राजेशकुमार यांनी दिले.

राजेशकुमार म्हणाले की, प्रयागराज कुंभमेळ्याचा अनुभव पाहता नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे २०२७ मध्ये भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता आहे. यासाठी गर्दी व्यवस्थापनाचे टप्याटप्प्याने नियोजन करणे आवश्यक आहे. भाविकांना उपलब्ध असलेल्या सोयीसुविधांची माहिती ॲप, पोर्टल आणि डिजिटल माध्यमांतून कुंभमेळ्यापूर्वीच उपलब्ध करावी. पार्किंगपासून ते अमृत स्नान स्थळापर्यंत भाविकांच्या सुरक्षित मार्गक्रमणासाठी एकात्मिक यंत्रणांची समन्वयपूर्ण कामगिरी ही महत्त्वाची आहे, असे त्यांनी नमूद केले. कुंभमेळ्यात महाराष्ट्राच्या कला आणि संस्कृतीला जागतिक पातळीवर पोहोचवण्यासाठी पर्यटन विभाग व सांस्कृतिक कार्य संचालनालय यांच्या समन्वयाने कार्यक्रम आखावेत, अशी सूचना देण्यात आली. मागील सिंहस्थ कुंभमेळ्यात काम केलेल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा अनुभव यावेळी उपयुक्त ठरेल, असेही त्यांनी सांगितले. स्वच्छ, सुंदर, हरित आणि पर्यावरणपूरक कुंभमेळा आयोजित करणे हे सर्व यंत्रणांचे सामाईक उद्दिष्ट असावे. सामाजिक संस्था आणि लोकसहभाग यांच्या मदतीने हा कुंभमेळा अपघातमुक्त आणि यशस्वी होण्यासाठी प्रयत्न करावेत, असेही ते म्हणाले.

**विकासकामांसाठी मार्चची मुदत**

कुंभमेळ्यासाठी प्रस्तावित पायाभूत सुविधांची कामे मार्च २०२७ पर्यंत पूर्ण झाली पाहिजेत, असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले. भूसंपादन, रस्ते, जलपुरवठा, वीजपुरवठा आणि इतर महत्त्वाच्या कामांमध्ये कुठल्याही परिस्थितीत विलंब होऊ नये. कुंभमेळ्याच्या काळात अर्धवट कामे राहणार नाहीत, याची खात्री प्रत्येक विभागाने द्यावी, असेही त्यांनी सांगितले.

# मीरा-भाईंदर परिसरामध्ये ७१ बेकायदा बोअरवेल्स





■**भाईंदर। प्रतिनिधी,**

भूगर्भजलाचा बेकायदा उपसा करून ते मिनरल वॉटर म्हणून विक्री करणाऱ्या पाणी माफियांविरोधात प्रशासनाने कडक भूमिका घेतली आहे. मीरा-भाईंदर परिसरातील ७१ बेकायदा बोअरवेलधारकांना महसूल विभागाने नोटिसा बजावल्या असून, पाणी माफियांचे प्लांट आणि अनधिकृत बांधकामे पाडण्याचा निर्णय महापालिकेतील संयुक्त बैठकीत घेण्यात आला आहे.

मीरारोडमधील डाचकुलपाडा येथे रिक्षाचालक आणि स्थानिक रहिवासी यांच्यात झालेल्या वादानंतर या भागातील बेकायदा बांधकामे आणि पाणी माफियांचा मुद्दा ऐरणीवर आला.


**स्वतंत्र गुन्हे दाखल करण्याची आवश्यकता**

दरम्यान, अनेक वर्षे भूगर्भजलाची चोरी करून पाणी माफियांकडून मोठ्या प्रमाणावर बेकायदा नफा कमावण्यात आला आहे. शासनाच्या मालकीच्या पाण्याची चोरी, त्याची विक्री आणि अनधिकृत बांधकामांसाठी स्वतंत्र गुन्हे दाखल करणे आवश्यक असल्याची मागणी जागरूक नागरिकांनी केली आहे. केवळ नोटीस देणे किंवा नाममात्र १० हजारांचा दंड आकारून प्रकरण निकाली काढू नये, असेही त्यांनी स्पष्टपणे सांगितले आहे.

# 'उलवे कोस्टल रोड' नवी मुंबईच्या कनेक्टिव्हिटीचा नवा अध्याय

■**नवी मुंबई। प्रतिनिधी,**

आगामी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबई ट्रान्स हार्बर लिंक, जेएनपीटी, नवी मुंबई सेझ आणि आम्र मार्ग यांना अखंडपणे जोडणारी आधुनिक पायाभूत सुविधा उभी करण्याच्या दृष्टीने सिडकोकडून राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांपैकी उलवे कोस्टल रोड प्रकल्प सर्वात महत्त्वाचा ठरत आहे. या प्रकल्पाची सुमारे ६० टक्के भौतिक प्रगती झाली असून, तो नियोजित वेळेत पूर्णत्वाकडे वाटचाल करत आहे.




**वाहतूककोंडी कमी होण्यासही मोठी मदत**

या मागार्मुळे टळल्छ, टटक्ष आणि आम्र मार्ग यांदरम्यान सिग्नलमुक्त आणि अखंड प्रवास शक्य होणार आहे. तसेच पाम बीच रोड, आम्र मार्ग आणि राष्ट्रीय महामार्ग ३४८वरील वाहतूककोंडी कमी होण्यासही मोठी मदत होईल. सुधारीत कनेक्टिव्हिटीमुळे दक्षिण मुंबई ते नवी मुंबई प्रवासकाळ मोठ्या प्रमाणात कमी होणार असून प्रवासी, लॉजिस्टिक्स आणि उद्योग क्षेत्रासाठीही ही मोठी दिलासादायक योजना ठरणार आहे.

एकूण अंदाजे ७ किलोमीटर लांबीचा सहापदरी (३+३) उन्नत उलवे किनारी मार्ग दोन टप्प्यांमध्ये विभागलेला आहे. ५.८० किमी किनारी महामार्ग आणि ०.९०३ किमी लांबीचा थेट नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाशी जोडणारा एअरपोर्ट लिंक रोड प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर हा मार्ग नवी मुंबईला जागतिक व्यापार, गतीमान वाहतूक आणि प्रादेशिक कनेक्टिव्हिटीचे प्रमुख प्रवेशद्वार बनवेल.

देशातील सर्वाधिक महत्त्वाकांक्षी विमानतळ प्रकल्प आणि सर्वात लांब सागरी पुलाला जोडणारा उलवे कोस्टल रोड हा नवी मुंबईच्या नागरी विकासातील महत्त्वाचा टप्पा ठरत आहे. दूरदृष्टी, शाश्वत अभियांत्रिकी आणि सुयोग्य नागरी नियोजनाची उत्कृष्ट सांगड या प्रकल्पातून दिसून येते.

**प्रवास अधिक वेगवान**

प्रकल्पाच्या मजबुतीसाठी उड्डाण पूल, मोठे पूल, रेल्वे ओव्हरब्रिज आणि विविध तांत्रिक संरचना उभारण्यात येत आहेत. प्रीफॅब्रीकेटेड व्हर्टिकल ड्रेन्स, दगडी खांब, आणि NMIA प्रकल्पस्थळ येथून प्राप्त भराव साहित्याचा वापर करून अत्याधुनिक ग्राऊंड-इम्प्रुव्हमेंट तंत्रज्ञान लागू केले जात आहे. संपूर्ण मार्गावर ऊर्जा-कार्यक्षम एलइडी दिवे, स्मार्ट ट्रॅफिक व्यवस्थापन प्रणाली, अत्याधुनिक सिग्नल यंत्रणा, लेन मार्किंग, ॲन्टी-क्रॅश बॅरिअर्स यांसह आधुनिक सुरक्षा उपायांची अंमलबजावणी होणार आहे. यामुळे प्रवास अधिक सुरक्षित, सुगम आणि वेगवान होणार आहे.

# पुण्यातला प्रसिद्ध डॉक्टर निघाला तोतया, आरोग्य विभागाने टाकली धाड

■**पुणे। प्रतिनिधी,**

भवानी पेठेतील कासेवाडी भागात बेकायदा दवाखाना चालविणाऱ्या तोतया डॉक्टरला खडक पोलिसांनी अटक केली. वैद्यकीय पदवी नसताना हा तोतया डॉक्टर मागील ३२ वर्षे दवाखाना चालवून रुग्णांवर उपचार करीत होता. त्याच्याविरोधात मे महिन्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर तो फरारी झाला होता. न्यायालयाने आरोपीला सोमवारपर्यंत पोलिस कोठडी सुनावली.

डॉ. प्रमोद राजाराम गुंडू (वय ५७) असे तोतया डॉक्टरचे नाव आहे. वैद्यकीय पदवी नसताना बेकायदा व्यवसाय करणाऱ्या तोतया डॉक्टरांविरुद्ध महापालिकेच्या आरोग्य विभागाने मोहीम हाती घेतली आहे. त्या अंतर्गत कासेवाडी भागात प्रमोद गुंडू बेकायदा दवाखाना चालवीत असल्याची माहिती आरोग्य विभागाच्या पथकाला मिळाली. त्यानुसार पथकाने तेथे जाणून पाहणी केली असता, गुंडू याने वैद्यकीय पदवी घेतली नसल्याचे; तसेच वैद्यकीय परिषदेकडे नोंदणीही केली नसल्याचे उघड झाले.




गुंडू मागील ३२ वर्षांपासून बेकायदा दवाखान्याच्या माध्यमातून रुग्णांवर उपचार करीत होता. त्यामुळे आरोग्य अधिकाऱ्यांनी दिलेल्या तक्रारीवरून त्याच्याविरोधात मे महिन्यात खडक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. तेव्हापासून तो फरारी झाला होता.

त्याने अटकपूर्व जामीन मिळण्यासाठी शिवाजीनगर येथील पुणे सत्र न्यायालयात अर्ज केला. न्यायालयाने तो फेटाळल्यावर त्याने उच्च न्यायालयात धाव घेतली. मात्र, उच्च न्यायालयानेही त्याचा अटकपूर्व जामीन अर्ज नामंजूर केला. दरम्यान, पोलिसांकडून त्याचा शोध घेतला जात होता. खडक पोलिस ठाण्यातील उपनिरीक्षक जयसिंग दाढे यांच्या पथकाने त्याला जेरबंद करून न्यायालयासमोर हजर केले. आरोपीला पोलिस कोठडी देण्याची मागणी सरकारी वकिलांनी केली. न्यायालयाने ती मान्य केली.

# व्यापारी पती कायम बाहेर असायचा, विवाहितेचे सोसायटीतील व्यक्तीसोबत प्रेमसंबंध जुळले

■**बदलापूर। प्रतिनिधी,**

बदलापूर शहराला हादरवून सोडणारी एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. तीन मुलांची आई असलेल्या एका महिलेने आपल्या विवाहित प्रियकराच्या मदतीने पतीची दोरीने गळा आवळून हत्या केली. एवढेच नाही, तर पतीने विरोध केल्यास त्यालाही मारहाण केली. त्यानंतर पतीचा मृतदेह उल्हास नदीत फेकून देण्यात आला. या घटनेमुळे शहरात एकच खळबळ उडाली असून, पोलिसांनी आरोपी पत्नी आणि तिच्या प्रियकराला अटक केली आहे.


**नेमकं काय घडलं?**

बदलापूर पश्चिम भागात राहणारे ४४ वर्षीय व्यापारी, त्यांची पत्नी आणि तीन मुलांसोबत राहत होते. व्यवसायानिमित्त त्यांना अनेकदा बाहेरगावी जावे लागत असे. याच काळात, त्यांच्या पत्न ीचे त्याच इमारतीत राहणाऱ्या एका विवाहित व्यक्तीसोबत प्रेमसंबंध जुळले. या प्रेमसंबंधांबद्दल पतीला माहिती मिळाल्यानंतर दोघांमध्ये वारंवार वाद होऊ लागले होते.

हत्येचा थरार शुक्रवारी मध्यरात्री, जेव्हा पती झोपेत होता, तेव्हा पत्न ी आणि तिच्या प्रियकराने मिळून ही क्रूर घटना घडवली. त्यांनी दोरीने पतीचा गळा आवळून त्याची हत्या केली. त्यानंतर, त्यांनी मृतदेह एका गादीत गुंडाळला. हा मृतदेह एका मोटरसायकलवर टाकून बदलापूर येथील वालवली पुलाजवळील उल्हास नदीपात्रात फेकून दिला.

**पोलिसांची कारवाई**

घटनेची माहिती मिळताच, पोलिसांनी तातडीने कारवाई केली. पोलीस आणि अग्निशमन दलाच्या मदतीने नदीतून मृतदेह बाहेर काढण्यात आला. या प्रकरणी बदलापूर पश्चिम पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपी पत्नी आणि तिचा विवाहित प्रियकर या दोघांना अटक केली असल्याची माहिती वपोनि किशोर शिंदे यांनी दिली आहे. या घटनेची परिसरात चर्चा होत आहे. या प्रकरणाचा पोलीस पुढील तपास करत आहेत.




# पुण्यात कॉलेज तरुणीला प्रेमाच्या जाळ्यात ओढलं

## घरी बोलवून शरीरसंबंध; पण नंतर... तरुणाच्या कृत्याने खळबळ

■**पुणे। प्रतिनिधी,**

पुणे शहरात महिलांवरील अत्याचारांच्या घटना वाढत असल्याचं चित्र आहे. अशातच अल्पवयीन मुलीला प्रेमाच्या जाळ्यात ओढून तिचा गैरफायदा घेत आर्थिक फसवणूक आणि लैंगिक अत्याचार केल्याचा धक्कादायक प्रकार फुरसुंगी परिसरात उघडकीस आला आहे. आरोपीने पीडितेचे खाजगी फोटो व व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देऊन पैसे उकळले आणि नंतर ते फोटो सोशल मीडियावर प्रसारित केल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी दिनेश राठोड (वय २४) या तरुणाविरुद्ध फुरसुंगी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फुरसुंगीतील अल्पवयीन मुलीशी आरोपीची ओळख सोशल मीडियाच्या माध्यमातून झाली. त्यानंतर त्याने तिला प्रेमाचे आमिष दाखवले आणि लग्नाचे आश्वासन देत तिचा विश्वास संपादन केला. नंतर आरोपीने पीडितेला आपल्या घरी बोलावून तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. या दरम्यान विकृत तरुणाने तिचे खाजगी फोटो व व्हिडिओ काढले होते. यानंतर आरोपीने सदर फोटो आणि व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देत पीडितेकडून तब्बल १ लाख १५ हजार रुपये उकळले. मात्र नंतरही आरोपीकडून तिला वारंवार पैशाची मागणी होऊ लागली. अखेर त्याला कंटाळून पीडितेने पैसे देण्यास नकार दिला. त्यामुळे नराधम आरोपीने पीडित तरुणीच्या नावाने बनावट इन्स्टाग्राम आयडी तयार करून, तसंच तिच्या भावाच्या फेसबुक अकाउंटवरून खासगी फोटो आणि व्हिडिओ शेअर केली, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.

दरम्यान, पीडितेच्या कुटुंबाला ही समजताच त्यांनी तत्काळ पोलीस ठाण्यात धाव घेतली. फुरसुंगी पोलिसांनी प्राथमिक चौकशीनंतर आरोपीविरुद्ध गंभीर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. सध्या आरोपी फरार असून, त्याच्या अटकेसाठी पोलिसांकडून पथकाची नेमणूक करण्यात आली आहे. या गंभीर घटनेनंतर पोलिसांनी युवकांना आणि पालकांना आवाहन केलं आहे. सोशल मीडियावर अपरिचित व्यक्तींशी संवाद साधताना सावधगिरी बाळगावी. अल्पवयीन मुलींशी गैरवर्तन करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्यात येईल, असंही पोलिसांनी स्पष्ट केलं आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com